नेमणे आहे

नामवंत दै. ‘जनता आवाज’ वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड

संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com


# दैनिक जनता आवाज


साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्

पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.



सिमेंट पाईप | सेप्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी, ढापे | सिमेंट पोल

सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534 | अमोल सिताराम थोरात पा. 9764626533 | ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच, को.बु॥

राजुरी रोड, श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे, कोल्हार बु॥ 9765481334



अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक ७४ | मंगळवार, दि. २९ एप्रिल २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये


## संमिश्र

### रणजित कासलेंवर चौथा गुन्हा दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अंबाजोगाई :** बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराड, माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यासह सरकारवर टीका करणारे बडतर्फ पोलिस अधिकारी रणजित कासले यांच्या विरोधात आणखी एक गुन्हा दाखल झाला आहे. अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यात कासले यांच्याविरोधात उसने पैसे घेतलेले परत न केल्याचा आरोप करत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आतापर्यंत रणजित कासले यांच्याविरोधात चार गुन्हे दाखल झाले आहेत.

### रील शूट करताना इन्फ्लुएन्सरचा विनयभंग

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** महिलांवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये वाढ होताना दिसत आहे. तसेच तरुणींना देखील बाहेर अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. त्यात एका प्रसिद्ध सोशल मीडिया इन्फ्लुएन्सरचा विनयभंग झाल्याची घटना घडली आहे. यावेळी या तरुणीने विनयभंग करणाऱ्या मुलाला चांगलाच धडा शिकवला आहे. यावरून तिच्या व्हिडिओवर अनेकांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत तसेच तिने केलेल्या कृतीचे सर्वांनी स्वागत केले आहे.

### ट्रक-बोलेरोचा भीषण अपघात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नागपूर :** मुंबई-कोलकाता राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघाताची घटना घडली आहे. यात बोलोरो आणि ट्रकमध्ये झालेल्या भीषण अपघातात चौघांचा घटनास्थळीचं मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे.

### वडेट्टीवारांवर देशद्रोहाचे कलम लावा : नितेश राणे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे :** विजय वडेट्टीवार यांच्या वक्तव्यावर मंत्री नितेश राणे यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. नितेश राणे म्हणाले की, ज्या काँग्रेसने भगवा आतंकवाद असा उल्लेख केला होता. म्हणून दहशतवादाला रंग नाही, असे वक्तव्य वडेट्टीवार कसे करू शकतात? त्यांनी काँग्रेसच्या नेत्यांची वक्तव्य ऐकावीत. त्यांची मानसिकता ही हिंदूंचा द्वेष करण्याची आहे. त्यांच्यावर देशद्रोहाचे कलम लावावे, असे म्हणत राणे यांनी संताप व्यक्त केला.




# शासनाच्या सेवा ऑनलाईन करा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचना

जनता आवाज वृत्तसेवा

**मुंबई : महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अधिकाधिक लोकाभिमुख झाला पाहिजे, यासाठी प्रयत्न करा. १५ ऑगस्टपर्यंत शासनाच्या सर्व सेवा ऑनलाईन करा.शासनाचा विभाग १५ ऑगस्टपर्यंत जो विभाग त्यांच्या सेवा ऑनलाईन करणार नाहीत त्या विभागाला दर दिवशी प्रत्येक सेवेकरिता एक हजार रुपयांचा दंड आकारला जाईल. शासनाकडून कोणत्या सेवा नागरिकांना दिल्या जातात याची शालेय जीवनातच विद्यार्थ्यांना या विषयाबाबत माहिती व्हावी यासाठी या अधिनियमाचा अभ्यासात सम ावेश करण्यासाठी कार्यवाही करावी अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्या.**



सह्याद्री अतिथीगृह येथे सामान्य प्रशासन विभाग व म हाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या अंमलबजावणीची दशकपूर्ती आणि ‘प्रथम सेवा हक्क दिन’निमित्त राज्यस्तरीय सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माहिती व तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव सुजाता सौनिक, राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनु कुमार श्रीवास्तव, ब्रँड अँबेसिडर पद्मश्री शंकर महादेवन, सोनाली कुलकर्णी, माजी राज्य सेवा हक्क मुख्य आयुक्त स्वाधीन क्षत्रीय, राज्य सेवा हक्क कोकणचे आयुक्त बलदेव सिंह, पुणेचे राज्य सेवा हक्क आयोगाचे आयुक्त दिलीप शिंदे यासह प्रशासनातील ज्येष्ठ वरिष्ठ सनदी अधिकारी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अंतर्गत सध्या हजार पेक्षा जास्त सेवा या कायद्याच्या अंतर्गत अधिसूचित केल्या आहेत. जवळपास ५८३ सेवा ऑनलाइन दिलेल्या आहेत. अजून ३०० सेवा या ऑनलाइन आणायच्या आहेत. पान ४

### लोकांचे जीवनमान सुसह्य होणार

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे मूलभूत अधिकार आपल्या संविधानात समाविष्ट केले हे मूलभूत अधिकार अधिकार सर्वांना मिळाले पाहिजेत.गेल्या दहा वर्षात तंत्रज्ञानाच्या गतीमध्ये खूप मोठ्या प्रमाणात फरक पडलेला आहे आणि म्हणून या सेवा अधिक गतिमान पद्धतीने करण्यासाठी आपण प्रयत्न करत आहोत. मंत्रालयात चेहरा पडताळणी ॲपमुळे देखील निम्मी गर्दी कमी झाली आहे. जीवनामध्ये इज ऑफ लिविंग आणण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. शासनाची सर्व सेवा व्हॉटसअ‍ॅप वर तसेच सर्व माहिती संकेतस्थळावरती उपलब्ध झाल्यास अनेक तक्रारी कमी होवून लोकांचे जीवनम ान सुसह्य होईल, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# आमचा पाण्याचा हक्क अबाधित ठेवा: आ. ओगले

**जनता आवाज वृत्तसेवा**



**श्रीरामपूर :** निळवंडे धरणामुळे श्रीरामपूरच्या हक्काच्या पाण्यावरती गदा आणू नये, असे प्रतिपादन श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघाचे आ. हेमंत ओगले यांनी केली.

गोदावरी उजवा कालव्यावरील वितरिका क्रमांक २० विशेष दुरुस्ती करण्याच्या सुमारे ४ कोटी रुपयांच्या कामाचा शुभारंभ माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील आणि आ. हेमंत ओगले यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी ते बोलत होते. आ. ओगले म्हणाले की, पूर्वी निळवंडे धरण होण्याच्या आधी भंडारदरा धरण भरल्यानंतर नदीमध्ये उपलब्ध असलेल्या ओवरफ्लोच्या पाण्यावर प्रवरा नदीवर असलेले केटी वेअर बंधारे तसेच लाभक्षेत्रातील टेलटँक, पाझर तलाव, गावतळे बांधण्यात आले. पाण्याची उपलब्धता गृहीत धरण्यात आली होती.

निळवंडे धरणाच्या अगोदर भंडारदारा धरणाच्या ओवर फ्लोचे पाणी गृहीत धरल्याने निळवंडे धरणात पाणी साठवताना या सगळ्याचा विचार होणे आवश्यक आहे, जेणेकरून लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांचा पिण्याच्या पाण्यासह शेतीच्या पाण्याचा महत्त्वपूर्ण प्रश्न मार्गी लागेल, असेही आ. ओगले यांनी स्पष्ट केले.

गोदावरी उजवा तट कालव्यावरील चारी नंबर २० प्रमाणेच १९ नंबरची चारी आणि पोट चाऱ्यांचे दुरुस्तीच्या कामाला प्रशासकीय मान्यता मिळाली असून, निविदा प्रक्रिया देखील पूर्ण करून सदर कामाला सुरुवात करावी, अशी मागणी केली आहे.

# कृषी प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी पर्वणी: आ. लंघे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** नेवासा फेस्टिवल अंतर्गत नेवासा येथे मराठा समाज सेवा संस्थेच्यावतीने आराध्या मंगल कार्यालयामध्ये आयोजित कृषी व औद्योगिक प्रदर्शनाचे उद्घाटन आ. विठ्ठलराव लंघे यांच्या हस्ते करण्यात आले. नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी येथे भरलेले कृषी प्रदर्शन हे शेतकऱ्यांसाठी पर्वणीच असल्याने या प्रदर्शनाचा शेतकरी व बचत गटांनी लाभ घ्यावा, असे आ. विठ्ठलराव लंघे पाटील यांनी केले. तीन दिवस चालणाऱ्या कृषी व औद्योगिक प्रदर्शनामध्ये कृषी, ऑटो, यंत्रसामग्री गृहपयोगी वस्तू, बचत गट उत्पादने, खाद्य जत्रा अशा ७० स्टॉलचा प्रदर्शनात समावेश आहे.

प्रदर्शनाचे उद्घाटन आ. लंघे पाटील यांच्या हस्ते फित कापून तर पंचगंगा उद्योग समूहाचे प्रमुख उद्योजक प्रभाकर शिंदे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले.



आ. लंघे यांनी मान्यवरांच्या उपस्थितीत विविध स्टॉलची पहाणी करून कृषी व औद्योगिक प्रदर्शनातील माहिती घेतली.

यावेळी बाळासाहेब पवार, भाऊसाहेब वाघ, डॉ. करणसिंह घुले, संजय लंघे, अशोकराव मोरे, प्रताप चिंधे, अनिल ताके, अजय वाबळे, मनोज पारखे आदी उपस्थित होते.

कृषी प्रदर्शनाचे संयोजक ॲड. संभाजीराव पवार यांनी मान्यवरांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. नेवासा तालुक्यासह पंचक्रोशीतील गावातील शेतकऱ्यांना प्रदर्शनातून नवीन तंत्रज्ञानाची माहिती व्हावी म्हणून या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

आ. लंघे म्हणाले की, कृषी व औद्योगिक प्रदर्शनामुळे शेतकऱ्यांच्या ज्ञानात निश्चितच भर पडणार आहे.

### पंचायत समिती माजी सदस्यावर प्राणघातक हल्ला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** तालुक्यातील तिसगाव येथे हॉटेलमध्ये किरकोळ कारणावरून वाद होऊन एका व्यक्तींवर जातीवाचक शिवीगाळ व प्राणघातक हल्ला करण्यात आला. यात पाथर्डी पंचायत समितीचे माजी सदस्य सुनील रामलाल परदेशी गंभीर जखमी झाले असून ते सध्या अहिल्यानगर येथील खाजगी हॉस्पिटलमध्ये अतिदक्षता विभागात उपचार घेत आहेत. याप्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रविण अनिल परदेशी (वय १९, रा. तिसगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार ज्ञानेश्वर म्हस्के आणि विशाल म्हस्के यांना पोलिसांनी अटक केली आहे. तर उर्वरित आरोपी फरार आहेत. या घटनेचा अधिक पोलिस तपास पोलीस करीत आहे.

# ८३ तलाव गाळमुक्त होणार

## आ. राजळे; शेवगाव-पाथर्डीसाठी ४ कोटींचा निधी मंजूर

**जनता आवाज वृत्तसेवा**



**पाथर्डी :** शेवगाव-पाथर्डी मतदारसंघातील ८३ पाझर तलाव, साठवण बंधारे, को. प. बंधारे व सिमेंट नाला बंधाऱ्यांमधून गाळ काढण्यासाठी शासनाच्या गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियानांतर्गत ४ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याची माहिती आ. मोनिका राजळे यांनी दिली.

१९७२ नंतर मतदारसंघात अनेक साठवण बंधारे आणि पाझर तलाव उभारले गेले होते. मात्र, कालांतराने या तलावांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने साठवण क्षमता आणि पाण्याचा पाझर कमी झाला होता. या पार्श्वभूमीवर शासनाने जानेवारी २०२३ मध्ये गाळमुक्त धरण योजना तीन वर्षांसाठी सुरू केली होती. यापुढे ही योजना कायमस्वरूपी राबवली जाणार असल्याची माहितीही आ. राजळे यांनी दिली.

या योजनेअंतर्गत २०२५-२६ या वर्षासाठी शेवगाव व पाथर्डी तालुक्यातील ३६ गावांतील ८३ तलाव व बंधाऱ्यांतील गाळ काढण्याच्या कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. ही कामे मृद व जलसंधारण विभागाच्या नियंत्रणाखाली, अद्यावत तंत्रज्ञानाच्या सहाय्याने तसेच सार्वजनिक व खाजगी भागीदारीतून पार पडणार आहेत. तलावांमधून काढलेला गाळ शेतकऱ्यांना मोफत उपलब्ध करून दिला जाणार असून त्यामुळे शेतीची सुपीकता वाढणार आहे. स्थानिक शेतकऱ्यांनी या मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन आ. राजळे यांनी केले आहे.

शेवगाव तालुक्यातील गोळेगाव, लाडजळगाव, पान ४

### पाणी साठवण क्षमतेत वाढ; सिंचनास फायदा

तलाव व बंधारे गाळमुक्त झाल्यामुळे त्यांच्या पाणी साठवण क्षमतेत लक्षणीय वाढ होणार आहे. परिणामी, भूगर्भातील पाणी पातळी वाढून हजारो हेक्टर शेती सिंचनाखाली येईल व जमिनीची सुपीकता सुधारेल, असेही आ. मोनिका राजळे यांनी नमूद केले.

# मोरवाडी धरणासाठी पाठपुरावा करणार : थोरात



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** आमदारकी ही माझ्यासाठी नव्हती तर तुमच्या सगळ्यांसाठी होती. सगळ्या सहकारी संस्थांना संरक्षण देणारे आमदारकीचे कवच होते. तालुक्याच्या विकासाची वाटचाल व सहकार टिकवण्यासाठी यापुढे सर्वांना एकत्र राहावे लागणार असून मोरेवाडी धरण व्हावे, ही आपली इच्छा होती. पुढील पाच वर्षात धरण पूर्ण करण्याची संकल्पना होती. ते धरण झाले पाहिजे, अशी मागणी करताना मोरवाडी धरणासाठी आपला पाठपुरावा कायम सुरू राहिल, असे प्रतिपादन काँग्रेसचे वरिष्ठ नेते तथा माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

साकूर येथे सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या सभासद व युवक हितचिंतकांसाठी आयोजित स्नेहसंवाद मेळाव्यात ते बोलत होते

यावेळी बाजारीव खेमनर, बाबा ओहोळ, सभापती शंकर खेमनर, डॉ. जयश्री थोरात, गणपत सांगळे, पांडुरंग घुले, आर. बी. राहणे, विठ्ठल भागवत, इंद्रजीत खेमनर, अशोक हजारे, साहेबराव बारवे यांच्यासह नवनिर्वाचित संचालक उपस्थित होते.

माजी मंत्री थोरात म्हणाले की, विधानसभेच्या निवडणुकीनंतर अनेक अफवा पसरवल्या गेल्या. दिशाभूल केली. मात्र विधानसभेला बसलेल्या धक्क्यानंतर आपण साखर कारखान्याची विशेष काळजी घेतली. दोन महिने सभासदांशी थेट संपर्क साधला. यामुळे विरोधकांनाही जाणवले की विधानसभेसारखी चूक कारखान्याच्या निवडणुकीत होणार नाही. सर्व पान ४

> निवडणूका जवळ आल्या की, काहीजण ऊस उत्पादक शेतकऱ्यांना जास्त भाव देतात. मात्र आपल्या सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याने पहिल्यापासूनच चांगला भाव दिला आहे. माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी नेहमीच सर्वांना बरोबर घेऊन काम केले आहे. तुम्ही चांगली साथ दिली आहे. याचबरोबर हजारो कुटुंब या साखर कारखान्यावर अवलंबून आहे. म्हणून हा सहकार टिकवण्याचे काम भविष्यात आपल्या सर्वांना करायचे आहे.
>
> **- डॉ. जयश्री थोरात**

# अवैध कत्तलखाने उद्ध्वस्त करा

## संगमनेरच्या गुन्हेगारीचा आ. खताळांनी घेतला आढावा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** संगमनेरात सुरू असणारे अवैध धंदे आणि अनाधिकृत कत्तलखान्यामुळे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे, असा कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणाऱ्या विघ्नसंतोषी प्रवृत्तीच्या लोकांवर अंकुश ठेवण्याचे काम पोलीस अधिकाऱ्यांनी करावे तसेच शहरात सुरू असणारे अवैध धंदे बंद करून अनधिकृत चालणारे सर्व कत्तलखाने उद्ध्वस्त करावे, असे सक्त निर्देश आ. अमोल खताळ यांनी संगमनेर शहर, तालुका व घारगाव पोलीस ठाण्याच्या पोलीस अधिकाऱ्यांना दिले.

संगमनेर शहरातील शासकीय विश्रामगृहावर संगमनेर शहर, तालुका घारगाव या तीनही पोलीस ठाण्यातील गुन्हेगारीबाबतचा आढावा घेण्यासाठी आ. खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक घेण्यात आली. या बैठकीस संगमनेर उपविभागाचे पोलीस उपाधीक्षक डॉ. कुणाल पान ४



> संगमनेर शहरातील अकोले नाका येथे मागील आठवड्यात काही अवैध धंदे करणाऱ्या व्यक्तींनी मारहाण केली आहे. त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यातील काही जणांना अटक करण्यात आली आहे. ते पुन्हा असे कृत्य करणार नाही, यासाठी वेळप्रसंगी त्यांची गावातून धिंड काढावी, अशा ही सूचना पोलीस अधिकाऱ्यांना दिल्या आहे.
>
> **- अमोल खताळ, आमदार**

# शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेला गतिमानता मिळणार

## महानगरपालिकेने शट डाऊनदरम्यान पाणीपुरवठा व्यवस्थेच्या दुरुस्तीवर दिला भर



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर : २६ एप्रिल रोजी नियोजित विजेच्या शटडाऊनचा वापर करून अहिल्यानगर महानगरपालिकेने शहरभरातील पाणीपुरवठा यंत्रणेच्या दुरुस्ती व देखभालीची मोठी कामे हाती घेतली. यामुळे पाण्याच्या गळतीत लक्षणीय घट झाली असून पुरवठा व्यवस्था अधिक कार्यक्षम बनली आहे. आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यवाही पार पडली.**

मुळानगर येथील ११ केव्ही मेन आयसोलेटरवर नवीन करंट ट्रान्सफॉर्मर बसवण्यात आला तर १०० केव्ही/२५०० केव्ही ट्रान्सफॉर्मरमध्ये तेल भरून लेव्हलिंग केले गेले. विळद येथील नवीन पंपहाऊसमध्ये ६०० एचपी पंप व मोटारची देखभाल करण्यात आली, तर नागपूरमध्ये १०० व २६८ एचपी मोटर्सना ग्रीस व तेल भरले गेले. या दुरुस्तीमुळे पाणीपुरवठा अधिक स्थिर होणार आहे.



शहरभर लीकेज दुरुस्ती अंतर्गत प्रभाग १ अंतर्गत नागपूर पितळे कॉलनी, डॉन बॉस्को कृष्णा अपार्टमेंट, नंदनवन नगर येथील पाईप लाईनमधील लीकेज दुरुस्त करण्यात आल्या. प्रभाग ३ व ४ मध्ये ९०० मिमी व १००० मिमी पीएससी पाईप लाईनच्या लीकेज दुरुस्त करून पाणी वाया जाण्यावर नियंत्रण मिळवले गेले. मुकुंदनगर झोनमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाजवळील ४ मेन लाईन लीकेज व गोविंदपुरा मेन लाईनची दुरुस्ती करण्यात आली.

> योजनाबद्ध शट डाऊनदरम्यान केलेल्या दुरुस्ती व सुधारणांमुळे शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेला गतिमानता मिळणार आहे. यामुळे नागरिकांना अखंडित व गुणवत्तापूर्ण पाणीपुरवठा उपलब्ध होईल, तसेच पाण्याच्या बचतीसाठीही ही कामे महत्त्वपूर्ण ठरली आहे.
>
> **- यशवंत डांगे, आयुक्त**

### नागरिकांच्या तात्पुरत्या गैरसोयीत झाली घट

शटडाऊनदरम्यान महावितरण कंपनीने ३३ केव्ही मुळा डॅम विद्युत वाहिनीवर केलेल्या ट्री कटिंग व देखभालीच्या कामांसाठी घेतलेल्या शटडाऊनचा फायदा महानगरपालिकेने पाणीपुरवठा व्यवस्थेच्या दुरुस्तीसाठी घेतला. यामुळे स्वतंत्र शटडाऊन घेण्याची गरज न राहिल्याने नागरिकांच्या तात्पुरत्या गैरसोयीत घट झाली आहे.

# जनतेला विहित वेळेत सेवा द्या : कोळेकर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम हा जनतेच्या हक्कांना जपणारा आहे. अधिकारी, कर्मचाऱ्यांनी अधिनियमांचे तंतोतंत पालन करुन जनतेला विहित कालावधीमध्ये सेवा उपलब्ध करून देण्याचे आवाहन अप्पर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात सेवा हक्क दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अरुण उंडे, तहसीदार शरद घोरपडे उपस्थित होते.

कोळेकर म्हणाले, विविध शासकीय कार्यालयात कामांसाठी होत असलेली गर्दी कमी करुन फेसलेस कार्यालय करण्याचा शासनाचा मानस आहे. त्यादृष्टीने अनेक सेवा ऑनलाइन पद्धतीने सामान्यांना उपलब्ध करुन देण्यावर भर देण्यात येत आहे. अधिकारी, कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणाला अधिक महत्त्व देऊन त्यांच्याशी संबंधित विषयांची माहिती प्रशिक्षणातून जाणून घेण्याची गरज आहे.

कार्यालयांमध्ये उपलब्ध मनुष्यबळाला प्रशिक्षणाच्या माध्यमातून सक्षम करण्यासाठीही प्रशासनामार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत. सार्वजनिक व सामाजिक कार्यात अग्रभागी राहणाऱ्या सक्षम प्रशासनाची फळी तयार करण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

# पद्मश्री विखेंचे दूरदर्शी विचार शेतकऱ्यांसाठी दीपस्तंभच: सौ.नळे



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथरे :** प्रवरेच्या कष्टकरी शेतकऱ्याला आर्थिक स्वायत्तता देत ग्रामीण भागातील मुलांसाठी शिक्षण संस्था, आरोग्यासाठी रुग्णालय, बॅक अशा विविध संस्थांची स्थापना केली. त्यांचे हे कार्य देशातील शेतकऱ्यांसाठी दीपस्तंभच ठरले आहे, असे प्रतिपादन सौ. अनिता नळे यांनी केले.

महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारी प्रणेते पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांची ४५ वी पुण्यतिथी लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या पाथरे बु. येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कार्यकर्ते गंगाधर पाटील घोलप हे होते.

पद्मश्रींनी सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून अनेक नवनवीन योजना राबविल्या. या योजनांद्वारा कारखाना कार्यक्षेत्रातील लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनात लक्षणीय सुधारणा झाली. उपसा सिंचन योजना, पाझर तलाव, नदीवरील बंधारे याशिवाय अनेक छोट्या सिंचनाचा लाभ शेतकऱ्यांना मिळवून दिला.

या कार्यक्रमात अंजली पिलगर, प्रियांका सिनारे यांनी पद्मश्रींच्या जीवनावर विद्यार्थ्यांना उदबोधित केले. त्यानंतर कार्यक्रमात अध्यक्षीय मनोगतात गंगाधर पाटील घोलप यांनी पद्मश्रींच्या जीवनावरती प्रकाश टाकला.

या कार्यक्रमासाठी गंगाधर घोलप, स्थानिक स्कूल कमिटीचे उपाध्यक्ष शशिकांत घोलप, सरपंच उमेश घोलप, माजी सरपंच सोपान घोलप, भाऊसाहेब घोलप,आण्णासाहेब कडू, भास्कर घोलप, अशोक घोलप, फ्रान्सिस कदम, दीपक कडू आदीसह महाविद्यालयाचे प्राचार्य के. बी. बारगुजे, उपप्राचार्य श्रध्दा वाणी, प्राथमिकचे मुख्याध्यापक नवनाथ घुगे, पर्यवेक्षक आण्णासाहेब तांबे, कनिष्ठ महाविद्यालयाचे समन्वयक डॉ. संदीप म्हस्के, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य बारगुजे यांनी केले. सूत्रसंचालन संतोष गुळवे व आभार संजय कडू यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर सेवकवृंद विद्यार्थी व यांनी परिश्रम घेतले.

# परिपूर्ण विद्यार्थी घडविण्यासाठी प्रवरा प्रयत्नशील

## डॉ. सुष्मिता विखे पाटील; प्रवरा कृषि शास्त्र संस्थेतील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेत शिक्षण घेण्यासाठी आलेला विद्यार्थी हा जीवनात परिपूर्ण होईल या उद्देशाने संस्था नेहमी प्रयत्न करत असते, हे विद्यार्थी आयुष्यात एक सृजनशिल नागरिक होतात, असे प्रतिपादन संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुष्मिता विखे पाटील यांनी केले आहे.

प्रवरा कृषि शास्त्र संस्थेत आयोजित अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभ कार्यक्रमात त्या प्रमुख अतिथी





म्हणून बोलत होत्या. यावेळी प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचे संचालक डॉ. उत्तमराव कदम, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. दिलीप महाले, कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. निलेश दळे, कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आशिष क्षिरसागर, प्राचार्या डॉ. चंद्रकला सोनवणे तसेच सर्व विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रवरा कृषी शास्त्र संस्थेतील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी मागील चार वर्षात संस्थेने राबविलेल्या विविध उपक्रमांमुळे आमचे भविष्यात चांगले करिअर होण्यास मदत होणार असल्याचे नमूद केले.

▶ लोणी या ठिकाणी शिक्षण घेत असताना मोठा आत्मविश्वास मिळाला. पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष कृतीतून शेतीमध्ये काम करता आले याचा निश्चित फायदा आम्हा विद्यार्थ्यांना होणार आहे. या माध्यमातून आम्ही चांगल्या नोकरीबरोबरच चांगली शेती ही करू शकतो आणि शेती व्यवसायामध्ये नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करत असताना प्रत्यक्ष कृतीतून मिळालेले मिळालेले ज्ञान महत्त्वपूर्ण ठरेल, अशा भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या.

प्रवरा कृषि शास्त्र संस्थेचे संचालक डॉ. उत्तमराव कदम यांनी संस्थेने गेल्या वर्षभरात राबविलेल्या शिवार फेरी, बिल्डिंग प्रवरा, पालक मेळावा, वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ, कॅम्पस मुलाखती , संशोधन प्रकल्प, क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा इत्यादीमुळे प्रवरेतून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे करिअर निश्चितच उज्वल होणार असल्याचे सांगितले.

सदर निरोप समारंभ कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, अधिकारी व विद्यार्थी आदींनी प्रयत्न केले.

# चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतले शनीदर्शन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई :** भारतीय जनता पार्टीचे चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी सायंकाळी शिंगणापूरला येऊन शनिदर्शन घेतले.

उदासी महाराज मठात कुटुंबियासह शनि अभिषेक करून चौथऱ्यावर जाऊन शनिमुर्तीवर तेल अभिषेक केला. जनसंपर्क कार्यालयात देवस्थानचे चिटणीस आप्पासाहेब शेटे यांनी शाल, शनि प्रतिमा देऊन बावनकुळे यांचा सन्मान केला. यावेळी आ. विठ्ठलराव लंघे, ऋषीकेश शेटे यांच्यासह भाजपचे नेवासा तालुक्यातील पदाधिकारी उपस्थित होते.स्वयंभू शनी मुर्तीचे दर्शन झाले असताना खूप समाधान वाटले असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. यावेळी शिंगणापूर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक आशिष शेळके यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# काश्मीर घटनेच्या निषेधार्थ कुकाणा कडकडीत बंद

## ग्रामस्थांकडून निषेध सभा; पाकिस्तान प्रतिकात्मक झेंड्याचे दहन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कुकाणा :** जम्मू काश्मीर मधील पहलगाम येथे हिंदूवरील अतिरेकी हल्ल्याच्या निषेधार्थ कुकाणा येथील सकल हिंदू समाज, सर्व व्यापारी संघटना व ग्रामस्थांच्या वतीने निषेध सभा व पाकिस्तानी प्रतिकात्मक ध्वजाचे दहन करून या मानवतेला काळिमा फासणाऱ्या घटनेचा कुकाणा गाव दिवसभर कडकडीत बंद ठेवून निषेध करण्यात आला.

नेवासा तालुक्यातील कुकाणा येथे जम्मू काश्मीरमध्ये पहलगाम येथील दहशतवाद्यांनी भारतीय पर्यटकांवर त्याचा धर्म विचारून निर्दयपणे हत्या केली. या निष्पाप पर्यटकांचा मृत्यू झाला, तर या हल्ल्यात अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत. दहशतवाद्यांनी केलेली क्रूर घटना म्हणावी लागेल.

या काश्मीर घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी कुकाणा येथील सकल हिंदू समाज, व्यापारी आसोसियन , युवक संघटना व ग्रामस्थांच्या वतीन रविवार (दि. २७) रोजी कुकाणा गाव संपूर्ण दिवसभर कडकडीत बंद ठेवून सकाळी १० वाजता बसस्थानक परिसरात निषेध सभा घेण्यात आली.

यावेळी अनेकांनी आपल्या भाषणातुन या घटनेचा तीव्र संताप व्यक्त करून दहशतवादी हल्ले करण्याची हिंमत करणाऱ्या हल्लेखोरांना जशास तसे उत्तर दिले पाहिजे. अशा तीव्र भावना व्यक्त करत या भ्याड हल्लाचा निषेध केला. तसेच निष्पाप नागरिकांना क्रूरपणे मारणाऱ्या आतंकवादीवर कडक कारवाई करावी अशी मागणी शासनाकडे केली. हे समाजावर झालेले थेट आक्रमण आहे. यावेळी भारत माता की जय, वंदे मातरम या घोषणेसह पाकिस्तानविरोधात घोषणा देण्यात येऊन पाकिस्तानचा प्रतिकात्मक ध्वज जाळून निषेध व्यक्त केला. मृत पावलेल्या पर्यटकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

पोलिस उपनिरीक्षक शैलेंद्र ससाणे, वाल्मिक वाघ व पोलीस कर्मचारी यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# खिर्डी गणेशातील भीमजयंती उत्साहात; एकतेचे दर्शन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव शहर :** कोपरगाव तालुक्यातील खिर्डी गणेश येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्सव समितीच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या आंनद उत्साहात सामाजिक ऐक्य दर्शवत साजरी करण्यात आली.

संपूर्ण गाव एकत्र येत या गावाने एकतेचे दर्शन घडवत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केले. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुध्द, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा





ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माता सावित्रीबाई फुले, माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून दिप प्रज्वलन व धूप प्रज्वलन करण्यात आले.

त्यानंतर भारतीय बौध्द महासभेचे जिल्हाध्यक्ष शांताराम रणशूर, पत्रकार बिपिन गायकवाड, बौध्दाचार्य नानासाहेब रोकडे यांनी उपस्थित उपासक व उपासिकांना त्रिशरण व पंचशील दिले. यावेळी उपस्थित मान्यवरांचा सत्कार उत्सव समितीच्या वतीने करण्यात आला. यानंतर सदर कार्यक्रमाची सुरुवात बालगोपालांच्या प्रभावी भाषणाने झाली.

डॉ. बाबासाहेबांच्या शिक्षणप्रेम, सामाजिक समतेसाठीचा लढा आणि संविधान निर्मितीतील योगदान यावर प्रकाश टाकला. त्यानंतर लहान चिमुकल्यांनी गायलेल्या भीम गीतांनी तेथील वातावरण भारावून टाकले आणि प्रत्येकाच्या मनात डॉ. बाबासाहेबांविषयीची निष्ठा आणि अभिमान जागवत याप्रसंगी उपस्थितांना शांताराम रणशुर यांनी प्रभावी आणि अभ्यासपूर्ण प्रबोधन करून बाबासाहेबांच्या संघर्षमय जीवनप्रवासाची प्रेरणादायी मांडणी केली.

याप्रसंगी खिर्डी गणेश सोसायटीचे चेअरमन चंद्रकांत रोहम, सरपंच चंद्रकांत चांदर, बौध्दाचार्य बिपीन गायकवाड, बौध्दाचार्य नानाभाऊ रोकडे यांनी डॉ. आंबेडकर त्यांच्या कार्याची आठवण करून दिली. यावेळी गुरुदास लोखंडे, राजेंद्र खंडीझोड, मच्छिंद्र वाघ, सतीश झाल्टे, भानुदास अभंगे, जगन अभंगे, राहुल लोखंडे, अक्षय लोखंडे, शुभम खंडीझोड, आशितोष लोखंडे, आदर्श पगारे, नारायण पगारे, प्रतीक खंडीझोड, अमोल खंडीझोड, आशिष खंडीझोड, विकास म्हस्के, संदीप झाल्टे, किरण लोखंडे माफी उपस्थित होते.

# प्रवरेच्या संदेश पिंगळेंची बृहन्मुंबई मनपामध्ये वर्णी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेअंतर्गत लोणी येथील प्रवरा कृषी शास्त्र संस्थेतील जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी संदेश पिंगळे याची नुकत्याच झालेल्या बृहन्मुंबई महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागामध्ये कार्यकारी सहाय्यकपदी निवड झाल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. निलेश दळे यांनी दिली.

नुकत्याच झालेल्या भरतीसाठी १८४६ जागेसाठी सुमारे दीड लाख पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होतो. यामध्ये संदेश पिंपळे याचा खुल्या वर्गात २४२ तर इतर मागास वर्गामध्ये २१ वा क्रमांक मिळवला.

यावेळी संदेश पिंगळे याचा सन्मान प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचे संचालक प्रा. डॉ. उत्तमराव कदम यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी प्राचार्य डॉ. दिलीप महाले, प्राचार्य डॉ. निलेश दळे, प्राचार्य डॉ. आशिष क्षीरसागर, प्राचार्या डॉ. चंद्रकला सोनवणे यांसह आदी शिक्षक उपस्थित होते. सदर विद्यार्थ्याला महाविद्यालयाचे ट्रेनिंग व प्लेसमेंट अधिकारी प्रा. भाऊसाहेब घोरपडे, प्रा. महेश चंद्रे व इतर शिक्षक वृंद यांचे मार्गदर्शन लाभले.

**दिग्गज मान्यवरांकडून कौतुकांचा वर्षाव**

▶ संदेश पिंगळेंच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील, संस्थेच्या मुख्य कार्यकरी अधिकारी डॉ. सुश्मिता विखे पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकरी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, सहसचिव भारत घोगरे, प्रवरा कृषीशास्त्र संस्थेचे संचालक डॉ. उत्तमराव कदम आदींनी अभिनंदन केले आहे.

# सकल ब्राह्मण समाज सेवा संस्था व परशुराम प्रतिष्ठानच्या वतीने रक्तदान शिबिर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** सकल ब्राह्मण समाजसेवा संस्था व परशुराम प्रतिष्ठानच्या वतीने भगवान परशुराम जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त सोमवार दि. २८ एप्रिल २०२५ रोजी आयोजित नालेगाव येथील जनकल्याण रक्तपेढीमध्ये रक्तदात्यांकडून ५१ रक्तपिश्व्यांचे संकलन झाले, असल्याची माहिती सकल ब्राह्मण समाज सेवा संस्थेचे अध्यक्ष राजाभाऊ पोतदार, सचिव विजय देशपांडे यांनी दिली.

यावेळी भारतमाता व भगवान परशुरामांच्या पादुकांचे, उत्सव मूर्तीचे यावेळी पूजन, औक्षण व पुष्पहार अर्पण करून या शिबिरास



प्रारंभ झाला.

यावेळी डॉ. राजीव चिटगोपेकर, आर्किटेक्ट इंजी. असो. अध्यक्ष आदिनाथ दहिफळे, अतुल शुक्ल, श्रीया देशमुख, गौतम कुलकर्णी, कांचन तांबोळी,कालिंदी केसकर, सिद्धेश्वर निसळ गुरुजी, मकरंद देशपांडे, मयूर देशपांडे, सार्थक भोंग, रत्नाकर कुलकर्णी, यशवंत आंबेकर, शशिकांत महाजन, तुषार मुळे, आकाश कुलकर्णी, सागर खिस्ती, देवीप्रसाद सोहनी यांच्या ब्राम्हण समाजातील बंधू, भगिनी व रक्तदाते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकाळी १० वाजता सुरू झालेल्या रक्तदान शिबिरामध्ये ५१ रक्तपिशव्या संकलित झाल्या. या रक्तदान शिबिरास जनकल्याण रक्तपेढीचे प्रशासकीय अधिकारी सागर उंडे, सहाय्यक प्रशासकीय अधिकारी स्मिता बडवे, डॉ. विलास मढीकर, डॉ. हर्ष शहा, डॉ. गौरी जोशी, सोनाली खांडरे, विनिता धामणगावकर व इतर सहकाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# गंगापूर तालुक्यातील तरुण जालनामधून बेपत्ता

**जनता आवाज वृत्तसेवा**

**गंगापूर :** जालन्याला जाणार असल्याचे सांगुन गेलेला तरूण बेपत्ता झाल्याची खळबळजनक प्रकार नुकताच गंगापूर तालुक्यातून समोर आली आहे. विश्वास ज्ञानेश्वर विधाटे (वय २६, रा. हदीयाबाद, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) असे बेपत्ता झालेल्या तरूणाचे नाव आहे.



गौरव विधाटे यांनी पोलिसांना दिलेल्या जबाबत सांगितले कि, माझा भाऊ विश्वास विधाटे हा २० एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता नेहमी प्रमाणे संजय ऑटो कंपनीत कामाला जातो म्हणून गेला. सांयकाळी ५ वाजता त्याने मला फोन करून सांगितले की, मी काही कामानिमित्त जालन्याला जाणार आहे. उद्या सकाळी येईल, परंतु दुसऱ्या दिवशी विश्वासला फोन केला असता त्याचा फोन बंद आला.

आम्ही त्याचा कंपनी नातेवाईक सर्वत्र शोध घेतला असता तो कुठे ही मिळुन आला नसुन बेपत्ता आहे. त्याचे वर्णन पुढील प्रमाणे, रंग सावळा, उंची ५ फुट ६ इंच, डोळे काळे आहे अशा वर्णनाचा तरूण मिळुन आल्यास गंगापूर पोलीसांशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस मुख्य हवालदार मनोज घोडके यांनी केले आहे.

# कोल्हेंच्या वाढदिवसदिनी जपली सामाजिक बांधिलकी

## शिर्डी येथील साई आश्रया अनाथाश्रमात अनाथ बालकांना व वृद्धांना दिले मिष्टान्न भोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** सहकार महर्षी कोल्हे कारखान्याचे अध्यक्ष व संजीवनी युवा प्रतिष्ठानचे संस्थापक युवानेते विवेक कोल्हे यांच्या वाढदिवसानिमित्त समाजाप्रती अनोखी बांधिलकी जपत अनाथ आश्रमात भोजनाचा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, देशावर शोककळा पसरलेली असताना विवेक कोल्हे यांनी वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला.



त्यांच्या या संवेदनशील निर्णयाला आदरपूर्वक प्रतिसाद देत, संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या युवासेवकांनी शिर्डी येथील साई आश्रया अनाथाश्रमात अनाथ बालकांना व वृद्धांना मिष्टान्न भोजनाचे आयोजन करून मानवतेचे उदाहरण घडविले.

याप्रसंगी अमृत संजीवनीचे चेअरमन पराग संधान, युवासेवक विशाल गोर्डे, सिद्धार्थ साठे, रामदास गायकवाड, दिनेश आदमाने, रोहित कणगरे, स्वप्निल मंजुळ, सतीश निकम, समाधान कुऱ्हे, प्रशांत संत, अजय शार्दुल, सागर राऊत, शुभम गिरे यांनी उपस्थित राहून प्रेमाने सेवा केली. अनाथ बालकांना व वृद्धांना प्रेमाने भोजन वाढले गेले आणि त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले आनंदाचे हास्य या उपक्रमाच्या यशस्वीतेची साक्ष देत होते. संजीवनी युवा प्रतिष्ठान ही संस्था केवळ सामाजिक कार्याच्या नावाखाली उपक्रम राबवत नाही, तर युवकांमध्ये सामाजिक बांधिलकीची भावना रुजविण्याचे कार्य करत आहे. विवेक कोल्हे यांच्या प्रेरणादायी नेतृत्वाखाली युवकांना योग्य दिशा मिळते आहे आणि त्यातून समाजहिताची जाणीव असलेली सक्षम पिढी घडते आहे. त्यांच्या कार्यशैलीचा आदर्श घेत युवकांनी हा सामूहिक उपक्रम हाती घेऊन सामाजिक जाणीवेसोबत संवेदनशीलतेचाही आदर्श घालून दिला आहे.

**'संजीवनी' लोकांसाठी बनली आशेचा किरण**

▶ संजीवनी युवा प्रतिष्ठान ही संस्था केवळ युवकांच्या उभारणीसाठीच नव्हे, तर समाजाच्या सर्व थरातील लोकांसाठी आशेचा किरण बनली आहे. विवेक कोल्हे यांचे नेतृत्व आणि त्यांच्या मूल्यांवर आधारित कार्य पद्धतीमुळे आज संस्थेच्या उपक्रमांना व्यापक सामाजिक मान्यता लाभली आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून समाजसेवेचा संदेश देत, विवेक कोल्हे यांच्या वाढदिवसाला खऱ्या अर्थाने अधिक मोल प्राप्त झाले.

# जिल्ह्यातील जुन्या कालव्यांच्या दुरुस्तीसाठी निधी देणार

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची ग्वाही

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** महाराष्ट्र दुष्काळमुक्त व्हावा यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली शासन सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे. शेतकऱ्यांना मुबलक पाणी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्ह्यातील जुन्या असलेल्या कालव्यांच्या दुरुस्ती व नूतनीकरणाचे प्रस्ताव तयार करण्यात यावेत. यासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नसल्याची ग्वाही राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

### सिंचन व्यवस्था प्रभावीपणे राबविणार

१५ ते ३० एप्रिल दरम्यान जलव्यवस्थापन कृती पंधरवडा राबविण्यात येत आहे. या उपक्रमातून गावोगावी शेतकरी, नागरिकांच्या अडचणी समजून घेत त्यांच्या सूचना जाणून घेतल्या आहेत. या सर्व सूचनांना एकत्रित करून सिंचन व्यवस्था अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचेही ते म्हणाले.

राहुरी तालुक्यातील ब्राम्हणी येथे महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमांतर्गत (एम. आय. पी.) टप्पा १ मधील मुळा प्रकल्पांतर्गत मुळा उजवा कालवा व वितरण व्यवस्था कामांची दुरुस्तीच्या कामाचे भूमिपूजन पालकमंत्री श्री. विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते.

पालकमंत्री विखे पाटील म्हणाले, मुळा धरणाच्या लाभक्षेत्रासाठी वरदान ठरणाऱ्या मुळा उजव्या कालव्याच्या नूतनीकरणाच्या कामासाठी ११० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या कामातून शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडणार आहे. वेगवेगळ्या उपक्रमातून उपलब्ध सिंचनातून अधिकाधिक क्षेत्राला प्रभावीपणे पाणी देत वितरण व्यवस्था सुधारण्यावर जलसंपदा विभागामार्फत भर देण्यात येत आहे. मुळा धरणातील गाळ काढण्याच्या कामास सुरुवात करण्यात येणार असून धरणावर फ्लॅपवॉल बांधण्यात येणार आहेत. यामुळे सुमारे ३ टीएमसी अतिरिक्त पाणी वाढणार असल्याचेही ते म्हणाले.

पाण्याचे संकट दिवसेंदिवस वाढत जाणार आहे. यावर उपलब्ध सिंचनातून अधिकाधिक क्षेत्राला प्रभावीपणे पाणी देत वितरण व्यवस्था सुधारण्यावर भर देण्यात येत आहे. वाढते सिंचनक्षेत्र तसेच उपलब्ध सिंचनाची क्षमता यातून शेतीला मुबलक पाणी पुरवठ्यासाठी धरणामधून चाऱ्याद्वारे पाणी पुरवठ्याऐवजी बंद पाईपलाईनद्वारे दिल्यास ते अधिक उपयुक्त ठरणार आहे.यामुळे पाण्याची होणारी गळती थांबून शेवटच्या टेलपर्यंत पुरेसे पाणी पोहोचवता येईल. यासाठी जलसंपदा विभागातील अधिकाऱ्यांनी प्रत्येक ठिकाणी नागरिकांशी संवाद साधून बंद पाईपलाईनद्वारे पाणी पुरवठ्यासाठी समंती घेण्याची सूचनाही त्यांनी यावेळी केली.

आमदार शिवाजी कर्डीले म्हणाले, मुळा धरणातील पाण्याचा अधिक प्रमाणात पिण्यासाठी करण्यात येतो. पाईपलाईनद्वारे पाण्याच्या पुरवठा केल्यास पाणी गळती थांबून लाभधारकाना याचा मोठा लाभ होईल. आमदार मोनिका राजळे, आमदार विठ्ठलराव लंघे यांनीही आपले मनोगते व्यक्त केली.



कार्यक्रमास आमदार शिवाजी कर्डिले, आमदार विठ्ठल लंघे, आमदार मोनिका राजळे, आमदार हेमंत ओगले, माजी आमदार पांडूरंग अभंग, सुभाष पाटील, नामदेव ढोकणे, बाळकृष्ण बानकर, सुवर्णा बानकर आदी उपस्थित होते.

# फार्मर्स कंपनीची वैजापुरात सहा लाखांची फसवणूक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर :** वैजापूर येथील वैजापूर फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लिमिटेडच् मका खरेदी-विक्री केंद्रातून सुमारे ६ लाख ३० हजार रुपयांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी कंपनीच्या संचालकांनी दिलेल्या तक्रारीवरून बाळासाहेब बाबुराव गायकवाड (रा. नांदगाव, ता. वैजापूर) यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. संचालक रामकृष्ण शेषराव तुपे यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.

वैजापूर फार्मर्स प्रोड्युसर कंपनी ही केंद्र सरकारच्या कॉर्पोरेट मंत्रालयाकडे नोंदणीकृत संस्था आहे. ही कंपनी वैजापूर परिसरातील शेतकऱ्यांचा शेतीमाल खरेदी करून त्यावर प्रक्रिया करते आणि बाजारभाव वाढल्यानंतर तो विकून नफा शेतकऱ्यांमध्ये वाटते. कंपनीने १० नोव्हेंबर २०२३ रोजी संचालक मंडळाच्या बैठकीत नांदगाव येथे मंगला बाळासाहेब गायकवाड यांच्या जागेवर विनामूल्य मका खरेदी केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेतला. यासाठी लागणारे साहित्य, जसे की ताडपत्री, वजन काटा, आर्द्रता मशीन आणि इतर किरकोळ वस्तू, बाळासाहेब गायकवाड



यांच्याकडे सोपवण्यात आल्या.

३१ डिसेंबर २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत मका खरेदी करण्यात आला. कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णा चांदोडकर यांनी हिशेब तपासला असता धक्कादायक बाब समोर आली. रेकॉर्डनुसार २ लाख ५८ हजार ५२५ रुपयांचा माल शिल्लक असताना प्रत्यक्षात तो माल कंपनीकडे आढळला नाही. तसेच, काळे मगर ट्रेडिंग कंपनीमार्फत मका खरेदी-विक्रीसाठी दिलेल्या ३ लाख ६९ हजार ८२६ रुपयांची थकबाकी दीपक नागे यांच्या ऑडिटमध्ये आढळली.

याबाबत संचालक मंडळाने गायकवाड यांच्याकडे विचारपूस केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यांनी केवळ ७० हजार रुपये जमा केले, तर ७२ हजार ४८७ रुपयांचे साहित्यही कंपनीला परत केले नाही, असे तक्रारीत नमूद आहे. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी कार्यरत असलेल्या कंपनीत अशा प्रकारे फसवणूक होणे गंभीर बाब मानली जात आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला असून, लवकरच याबाबत अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

# लवांडे यांना डॉ. मनीभाई राष्ट्रसेवा पुरस्कार वितरित

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** राष्ट्रहितासाठी समर्पित भावनेने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सेवावृत्तींचा गौरव करण्यासाठी पद्मश्री डॉ. मनीभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार रविवार दि. २७ रोजी पुणे येथील आंबेडकर भवन येथे वितरित करण्यात आले.

पद्मश्री डॉ मनीभाई देसाई प्रतिष्ठान एन. वाय. के. क्रीडा व युवक कल्याण मंत्रालय, निती आयोग भारत सरकार, तसेच एम. एस. एम. इ. उद्योग मंत्रालय भारत सरकार संलग्नित संस्थेच्यावतीने हे पुरस्कार प्रदान करण्यात येतात. प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष ज्येष्ठ समाजसेवक आणि प्रवचनकार



डॉ. रवींद्र भोळे यांच्या हस्ते हे पुरस्कार वितरित आले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष रवींद्र भोळे यांनी सांगितले की, राष्ट्रभक्तीची ज्योत तेवत ठेवण्यासाठी, राष्ट्रीय एकात्मतेचे जतन करण्यासाठी आणि सामाजिक कार्याचे कार्याचे मूल्यमापन व प्रेरणा देण्यासाठी हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. २७ एप्रिल रोजी रविवारी संध्याकाळी पुणे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन पुणे स्टेशन या ठिकाणी भव्य समारंभात कृषी व सामाजिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल रावसाहेब लवांडे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या समारंभाला पोलिस अधीक्षक पंकज देशमुख, आमदार राहुल दादा कुल, आमदार अमोल जावळे, प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिले.

# ॲड. प्रकाश आंबेडकर यांची कोतूळला भेट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष तसेच भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय सल्लागार ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी अकोले तालुक्यातील कोतूळ गावाला भेट दिली.

दिनांक २७ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता कोतुळ येथील जान्हवी लॉन्स या ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रथमतः महामानव बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर वंचित बहुजन आघाडीच्या प्रवक्त्या उत्कर्षा रुपवते यांनी ॲड.प्रकाश



आंबेडकर यांचे स्वागत करून सन्मान केला. दि बुध्दिस्ट सोसायटी ऑफ इंडिया अर्थात भारतीय बौद्ध महासभेच्या अकोले संगमनेर कोपरगाव तालुक्याच्या वतीने समता सैनिक दलाच्या जवानांनी आंबेडकर यांना मानवंदना दिली.

देशमुखांचे नातू व त्यांच्या कुटुंबीयांनी ॲड.बाळासाहेब आंबेडकर यांना त्यांच्या वाड्यावर नेऊन यथोचित असा सन्मान केला. यावेळी अहिल्यानगर उत्तर विभागाचे भारतीय बौध्द महासभेचे जिल्हाध्यक्ष शांताराम रणशूर, सरचिटणीस नरेंद्र पवार, हिशोब तपासणीस, विजय जगताप तसेच सर्व तालुक्यांचे पदाधिकारी याप्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी ॲड.बाळासाहेब आंबेडकर यांच्या संरक्षणाची जबाबदारी कोपरगाव तालुका समता सैनिक दलाचे कमांडर किरण गायकवाड, दगुजी साबळे, विजय भातणकर, रामनाथ जाधव, सुमित आहेर, विलास गवळी, प्रकाश जगताप, गणेश निळे, अजय पाटील आदींनी कार्यक्रम स्थळावर चोख बंदोबस्त ठेवला होता.

# विष घेवून विवाहितेची आत्महत्या; सासरच्या चौघाविरोधात गुन्हा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**देवळाली प्रवरा :** विवाहितेचा ३ वर्षापासून बंगल्याच्या कामासाठी ३ लाख रुपयांची मागणी करत तसेच मामेसासऱ्याने तिच्यावर वाईट नजर ठेवत तिला मारहाण करत छळ केल्याने वीष प्राशन करुन आत्महत्या केल्याचा प्रकार अहिल्यानगर तालुक्यातील देहरे येथे घडला आहे. आत्महत्याग्रस्त विवाहित तरुणीचे माहेर देवळाली प्रवरा ता. राहुरी येथिल आहे.

देहरे (ता. अ.नगर) येथे आपल्या सासरी राहत



असलेल्या पूनम विशाल लांडगे या विवाहितेचा सासरच्यांनी तीन वर्षापासून बंगल्याच्या फर्निचर व कलर कामासाठी ३ लाख रुपयांची मागणी करत पैशांसाठी तिला उपोशी पोटी ठेवून तिचा छळ केला तसेच पुनम हिचा मामेसासरा जालिंदर करांडे याने तिच्यावर वाईट नजर ठेवून तिच्याशी लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करत तिचा छळ करुन तिला मारहाण शिवीगाळ केल्याचा प्रकार घडला होता. या छळाला कंटाळून काल शनिवार दि. २६ एप्रिल रोजी रात्री उशिरा पुनम हिने राहात्या घरी काहीतरी विषारी औषध घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी पूनम हिचे वडील गोविंद गंगाधर पटारे (रा. देवळाली प्रवरा, ता. राहुरी) यांनी एमआयडीसी पोलिसात फिर्याद दिल्यावरुन आरोपी नवरा विशाल रावसाहेब लांडगे, मामे सासरा जालिंदर सयाजी करांडे, सासू सुंदरबाई रावसाहेब लांडगे, मामेसासू रोहिणी जालिंदर करांडे सर्व रा. देहरे, ता. जि. अहिल्यानगर यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अक्षय तृतीयामुळे आंब्याची आवक वाढली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** फळांचा राजा असलेल्या आंब्याचे नगरच्या बाजारात आगमन होऊन दीड महिना झाला आहे, परंतु आवक कमी होती. परंतु अक्षय तृतीया मुळे देवगड, रत्नागिरी तसेच परराज्यातून होणारी आवक जास्त झाल्याने सर्वसामान्यांना परवडतील अशा दरांत आंबे उपलब्ध आहेत. त्यामुळे ग्राहकांकडून चांगली मागणी आहे. अशी माहिती नवीपेठेतील पप्पू आहुजा आब्यांचे आढीचे संचालक कैलास आहुजा यांनी दिली.

दिनांक ३० एप्रिलला अक्षयतृतीया मुळे नगरमध्ये आंब्याची आवक वाढली आहे. तर सध्या लालबाग आंबाच्या दर ४०० ते ५०० रुपयात दोन डझनची करंडी मिळत असून ओरिजनल हापूस १००० ते १६०० रुपये २ डझनची पेटी मिळत आहे.

केरळ, चेन्नई, हैदराबाद, कर्नाटक तसेच



कोकणातून सुमारे ३० ट्रक हापूस, बदाम, लालबाग, मद्रास अंबा आला आहे. एका ट्रकमध्ये साडेसहाशे पेट्या असतात.एका पेटीत दोन ते अडीच डझन आंबे असतात. सध्या नवीपेठेतील पप्पू आहुजा आंब्याच्या आढीवर प्रतवारी करण्याचे काम जोरात सुरु आहे. दरवर्षी अक्षय तृतीयेला सर्वात जास्त आंब्याची विक्री सगळीकडे होत असते.

# भारत गॅस एजन्सीच्या गोडाऊनमध्ये चोरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पाथर्डी तालुक्यातील चिंचपूर इजदे येथे भारत गॅस एजन्सीच्या गोडाऊनमध्ये अज्ञात चोरट्यांनी धाडसी चोरी करत अंदाजे ३१,५०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे.

यासंदर्भात सुनिल अंकुशराव बेलगे (वय ३४ वर्षे, रा. चिंचपूर इजदे) यांनी पाथर्डी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला आहे. त्यांच्या फिर्यादीनुसार, दि. २४ एप्रिल रोजी आपल्या भाचीच्या लग्नासाठी कुटुंबासह पाथर्डी येथे गेले असताना त्यांनी भारत गॅस एजन्सीचे गोडाऊन बंद केले होते. परंतु दि.२६ एप्रिल रोजी सकाळी गोडाऊन उघडताना त्यांनी गोडाऊनची पश्चिम बाजूची खिडकी तुटलेली व गोडाऊनमधून रेग्युलेटरचा एक बॉक्स (किंमत १२,५०० रुपये) व गॅस पाईपची एक गोणी (किंमत १९,००० रुपये) असा एकूण ३१,५०० रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेल्याचे निदर्शनास आले.या प्रकरणी पाथर्डी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

# बाजीराव पेशवे कुशल सेनापती : एकबोटे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** रणझुंजार योध्दा श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांची २८५ वी पुण्यतिथी कोपरगाव शहरातील ब्राह्मण सभा येथिल मंगल कार्यालयात नुकतेच संपन्न झाले. यावेळी पिपल्स बँकेचे जनरल मॅनेजर दिपक एकबोटे यांच्या हस्ते पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी दिपक एकबोटे म्हणाले की, श्रीमंत बाजीराव पेशवे हे झुंझार योध्दे होते. ते कुशल सेनापती असल्याने सर्व मोहिमेत अपराजित



राहिले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ब्राह्मण सभेचे अध्यक्ष मकरंद कोऱ्हाळकर यांनी केले.

यावेळेस माजी नगराध्यक्ष ऐश्वर्यलक्ष्मी सातभाई, उपाध्यक्ष राजेंद्र जवाद, बी. डी. कुलकर्णी, संजीव देशपांडे, वसंतराव ठोंबरे, महेंद्र कुलकर्णी, सदाशिव धारणगावकर, अनिल कुलकर्णी आदि पदाधिकार कार्यकारिणी सदस्य तसेच सुनिता कोऱ्हाळकर, शामल कुलकर्णी, पत्रकार मनोज जोशी, एस. पी. कुलकर्णी, सुनील गोखले, अशोक जोशी, भारत प्रेस संदीप जोशी, दिपक पाठक, विलास पोतदार आदी समाज बांधव याप्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे स्वागत महेंद्र कुलकर्णी यांनी केले तर आभार उपाध्यक्ष बी. डी. कुलकर्णी यांनी मानले.

# डॉ. तनपुरे निवडणुकीत साखर कामगार युनियन उतरणार?

## तीन हजार कामगार सभासद निवडणुकीची दिशा बदलवणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी फॅक्टरी :** राहुरी तालूक्याची कामधेनू असलेला डॉ. बा. बा. तनपुरे सहकारी साखर कारखाना अनेक वर्षापासून बंद पडलेला आहे. बंद पडलेल्या साखर कारखान्यात संचालक मंडळाच्या निवडणूकीत उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी चढाओढ सुरु आहे. कारखान्याच्या सलग्न संस्थेवर डोळा ठेवून निवडणूकीत चुरस निर्माण होणार असेल तर कामधेनूमध्ये मोठे काही तरी घबाड असल्याची चर्चा सुरु आहे. कारखान्याच्या एकुण सभासदांपैकी तीन हजार सभासद हे कामगार असल्याने साखर कामगार युनियने निवडणूकीत उडी घेतली असून कामगार युनियन स्वतंत्र पॅनल उभा करुन तालुक्यातील राजकीय नेत्यांच्या विरोधात राजकीय दंड

तनपुरे साखर कारखान्यात पाच हजार सभासद असून त्यापैकी तीन हजार सभासद हे कामगार मतदार आहेत. १५०० ते १६०० शेतकरी, सभासद मतदार आहेत. कामगारांनी एकजुट केल्यास कारखान्यावर कामगारांची सत्ता येवू शकते. आजपर्यंत कामगारांची वेळोवेळी फसवणूक झाली आहे. संचालक मंडळ निवडणूकीसाठी कितीही आणि कोणाचेही पॅनल तयार होऊ द्या. परंतू कामगारांच थकीत रक्कमा देण्यासाठी सर्वजण उदासीन आहेत. गेल्या २० वर्षांपासून कामगारांची सर्वच संचालक मंडळांनी फसवणूक केली आहे. डॉ.तनपुरे कारखान्यातील कामगार हे सभासद मतदार आहे.तीन हजार कामगार मतदान असल्याने या निवडणूकीत वेगळा असा निकाल लागला जावू शकतो.

थोपटणार आहे. बंद पडलेल्या कारखान्याच्या निवडणूक चौरंगी लढत होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

डॉ. तनपुरे सहकारी साखर कारखाना कार्य स्थळावर साखर कामगार युनियनचा मेळावा लक्ष्मीनारायण मंदिराच्या प्रारंगणात नुकताच पार पडला. बंद पडलेल्या कारखान्याच्या निवडणूकीसाठी विक्रमी अर्जाची विक्री होते. तीन ते चार पॅनल तयार होतील. येवढ्या अर्जांची विक्री होत असेल तर बंद पडलेल्या कारखान्यात मोठे काही तरी घबाड असल्याची चर्चा सध्या सुरु असल्याची युनियन सेक्रेटरी सचिन काळे यांनी सांगितले.

१९९८ पासून २०२२ पर्यंत कामगारांची



जी थकीत रक्कम मिळवण्यासाठी अनेक प्रकारचे आंदोलने केली. कामगारांची ग्रॅज्युटी, बोनस, थकीत पगार असे सगळे धरून १३८ कोटी रुपये थकीत आहेत. कारखान्याची सत्ता ताब्यात घेण्यासाठी जो- तो म्हणतो कारखाना चालू झाल पाहिजे. परंतू कारखाना नेमका कुणासाठी चालू झाला पाहिजे. आज मात्र प्रत्येक पुढारी कामगारांना दोष देत आहे. बँकेचे कर्ज जसे महत्वाचे आहे. तसेच कामगारांची थकीत रक्कम कधीच विचारात घेतले जात नाही. गेल्या वीस वर्षात संचालक मंडळांनी कामगारांची फसवणूक केली आहे. कामगारांच्या हक्काच्या पगारासाठी कामगारांनी एकत्र येवून निर्णय घेण्याची वेळ आली आहे. असे अनेक कामगारांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले.

यावेळी युनियनचे सेक्रेटरी सचिन काळे, वसंतराव मुसमाडे, सोपान घोरपडे, रफिक सय्यद, शिवाजी बंगाल, भरत पेरणे, विठ्ठल म्हसे, चंद्रकांत कराळे, इंद्रभान पेरणे, कारभारी खुळे, रावसाहेब आल्हाट आदींनी मनोगत व्यक्त केले.

# संपादकीय

## अतिरेक्यांना किंमत मोजावी लागेल...

दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला करत निर्दोष, नि:शस्त्र पर्यटकांवर गोळ्या झाडल्या. मृत आणि जखमींच्या नातलगांचा आक्रोश देशाचेच नव्हे तर जगाचे हृदय पिळवटून टाकत आहे. पृथ्वीवरील स्वर्गातला हा नरकवास आता संपवायलाच हवा. हा हल्ला आकस्मित नसून त्यासाठी कमीत कमी महिनाभर आधीपासून तयारी केली असणार हे खात्रीने सांगता येते. हल्ला झालेल्या ठिकाणी कोणतेही वाहन जाऊ शकत नाही. तेथे पायी अथवा घोड्यावरुनच जावे लागते. पठाराचा हा परिसर आवर्जून पाहण्याजोगा असल्यामुळे लोक येथे मोठ्या संख्येने गर्दी करतात. यात तरुणांची संख्या नोंद घेण्याजोगी असते. मात्र पठारापर्यंत पोहोचण्यासाठी एकच पायवाट असल्यामुळे येथे हल्ला करणे अगदी सोपे होते. याचाच फायदा घेत दहशतवाद्यांनी पर्यटकांना लक्ष्य केले. खरे पाहता काश्मीरमध्ये सुरक्षेची मजबूत व्यवस्था आहे. विविध पातळ्यांवर ती घेतली जाते. मात्र या प्रसंगी आर्मफोर्स तेथे होते का, नसतील तर त्याम ागील कारण काय, सुरक्षा यंत्रणेच्या कड्यांमधून दहशतवादी शस्त्रांसह पठारावर कसे प्रवेश करु शकले हे आणि यासारखे अनेक मुद्दे विचारात घेण्याजोगे आहेत. दहशतवाद्यांनी या बैसरन पठाराची निश्चितच आधी तपासणी केली असणार. पळून जाण्याचे मार्ग निश्चित केले असणार. हे काम पाकिस्तानसमर्थित आणि पाकिस्तानातून प्रशिक्षण घेऊन आलेल्या लोकांचेच आहे. अगदी आठ दिवसांपूर्वीच पाकिस्तानचे सेनाध्यक्ष जनरल असीम मुनीर यांनी एका व्याख्यानात भारतावर सडकून टीका केली होती. भारतात हदू-मुस्लीम समुहात सहमती नसल्याचे सांगत त्यांनी काश्मीरचाही उल्लेख केला होता. काश्मीर हा पाकिस्तानसाठी शरीराला आधार देणाऱ्या हाडाच्या सापळ्यासारखा असून हा प्रदेश भारतामध्ये असेपर्यंत पाकिस्तान सुखाने राहणार नाही, असे त्यांनी म्हटले होते. त्यांचे हे जहरी वक्तव्य कोणत्याही दहशतवादी प्रवृत्तीच्या व्यक्तीला पाकिस्तानी सैन्याचे आपल्याला पूर्ण समर्थन असल्याचा विश्वास देणारे होते. ही पार्श्वभूमी नोंद घेण्याजोगी आहे. या नरसंहारातून दहशतवाद्यांनी भारताबरोबरच सौदी अरेबिया आणि अमेरिकेलाही अप्रत्यक्ष इशारा दिला आहे, असे म्हणावे लागेल. तुम्ही भारताशी संबंध वाढवले तर आपण कोणत्याही पातळीपर्यंत उतरु शकतो, हेच त्यांनी या कृतीतून दाखवून दिले.

या हल्ल्याद्वारे अतिरेकी शक्तींनी मोदी सरकारला इशारा दिला आहे. त्यांच्यावर निशाणा साधला आहे. काही स्थानिकांचा तसेच राजकीय वर्तुळातील मंडळींचा या प्रकरणात हात असल्याची शंका आहे. हे लोक कोणत्या पक्षाचे, कोणत्या विचारधारेचे असतील ही बाब वेगळी; पण काही नेत्यांचा प्रभाव असणाऱ्या भागातच वारंवार दहशतवादी हल्ले का होतात, याचा अभ्यास होणे गरजेचे आहे. गुप्तचर यंत्रणा परिसरातील दहशत माजवणाऱ्या संघटना, शक्तीवर बारीक नजर ठेवून असते. त्यांच्या हालचालींचा अंदाज घेत असते. अशा संघटनांना कोणाची मदत मिळते, त्यांचे धागेदोरे कुठपर्यंत पोहोचतात हेदेखील ते पहात असतात. असे असताना मिळालेल्या माहितीचा वापर का केला नाही आणि माहितीच नसेल तर अधिकाऱ्यांना पदावर राहण्याचा अधिकार आहे का, या प्रश्नाचे उत्तरही आता शोधावे लागेल. ताज्या हल्ल्यामध्ये एका स्थानिकाचा सहभाग असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. मात्र किमान तीन हल्लेखोर स्थानिक असावेत, असा संशय आहे. असे लोक पाकिस्तानातून येणाऱ्या दहशतवाद्यांना जागा दाखवतात. परिसराची खडानखडा माहिती देतात. रस्ते दाखवतात. त्यामुळेच या हल्ल्यात स्थानिक दहशतवाद्यांची मोठी साखळी कार्यरत होती, हे नाकारुन चालणार नाही. काही दिवसांमध्येच याचा सविस्तर तपशील आपल्याला समजेल. इथे लक्षात घ्यायला हवे की, एखाद्या बलाढ्य व्यक्तीशी लढण्यासाठी स्वत: बलिष्ट असावेच लागते, असे नाही. बलाढ्य व्यक्तीच्या मर्मस्थळी, त्याचे कमजोर दुवे शोधून हल्ला करुनही काम होऊ शकते. काश्मीरसारखा नाजूक मुद्दा निवडून पाकिस्तान नेमके हेच साधत आहे. भारत प्रबळ आहे, यात शंका नाही. मात्र भारतीय सैन्य वा संरक्षण यंत्रणा सदासर्वकाळ प्रत्येक ठिकाणी असू शकत नाही. त्यामुळेच स्थानिकांच्या सहभागाच्या साह्याने दहशतवादी कमकुवत ठिकाणे हेरतात आणि निरपराध्यांवर असे भ्याड हल्ले करतात. अशांसाठी पर्यटक हे नेहमीच सोपे सावज असते, कारण एक म्हणजे त्यांना परिसराची सविस्तर माहिती नसते. ते भागामध्ये नवखे असतात. त्यामुळे तातडीने मदत मिळवणे अवघड असते. म्हणूनच कोणतेही शस्त्र हाती नसणाऱ्या, घाबरलेल्या मनस्थितीतील लोकांवर हल्ला चढवणे त्यांच्यासाठी एक सोपा खेळ होऊन जातो. पुलवामा, उरी, बालाकोटचे हल्ले आपल्या स्मरणात आहेत. मात्र अजूनही त्यांची मुजोरी संपलेली नाही. त्यामुळेच पाकिस्तानचा विनाशकाल जवळ आला आहे, असे म्हणायलाही हरकत नाही. फक्त या भ्याड हल्ल्याचे षडयंत्र नेमके कोणी रचले, कसे पुर्णत्वाला नेले आणि याला नेमके कारणीभूत कोण हे स्पष्ट व्हायला हवे.

# उद्याचे स्मार्ट वाहन

**तंत्रवेध**

**– डॉ. दिपक शिकारपूर**




उद्याचे स्मार्ट वाहन हे पूर्णपणे इंटरनेटशी जोडलेले असेल. त्यात कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज आणि सेन्सर टेक्नॉलॉजी यांचा वापर असेल. ही वाहने सौर किंवा विद्युत ऊर्जेवर चालतील. त्यामुळे पर्यावरणाचे रक्षण होईल. उद्याचे स्मार्ट वाहन अधिक आरामदायक, कार्यक्षम आणि सुरक्षित असेल. ते अधिक वैयक्तिकृत आणि कनेक्टेड असेल आणि अधिक लवचिक प्रवास पर्याय प्रदान करेल.

वाहन म्हणजे दळणवळणासाठी एक अत्यावश्यक बाब. मानवाने वाहनांचा उपयोग केल्याची नोंद हजारो वर्षांपासून आहे. पहिल्या जलयानाचा शोध सुमारे सात ते नऊ हजार वर्षांपूर्वी लागला असावा असे काही पुराव्यांवरून दिसून आले आहे. सुमारे सात हजार वर्षांपूर्वी समुद्रावर चालू शकेल अशी नौका कुवेतमधील उत्खननात दिसून आली. प्राण्यांचा वापर करून प्रवास ही पद्धत अनेक शतकांपासून लोकप्रिय आहे आणि अजूनही अनेक दुर्गम भागात प्रचलित आहे. उद्याच्या तंत्रमय भविष्यात अनेक पैलू क्रांतिकारी पध्दतीने बदलणार आहेत. अनेक उपकरणे, प्रथा, प्रक्रिया कालबाह्य होतील. मग या सर्व उत्क्रांतीला वाहन कसे अपवाद ठरेल? विसाव्या शतकात संगणक जन्माला आले. पूर्वी खूप मोठ्या आकाराचे हे उपकरण स्वस्त, छोटे आणि शक्तिशाली होत गेले. हे तिन्ही प्रवाह एकाच वेळी कार्यरत होते. पण भौतिक जग आणि संगणकीय बिट, बाइटचे व्हर्च्युअल जग पूर्णपणे वेगळे होते. त्यांची एकमेकात ढवळाढवळ नव्हती. उदा वाहनाचे फ्युएल गेज फक्त इंधनाची पातळी सांगायचे आणि संपत आले की लाल दिवा लागायचा. पण हे चित्र २०१० नंतर बदलू लागले. २०२६ नंतर तर त्यात आमूलाग्र बदल घडतील. सेलफोन, जीपीएस, इंटरनेट आणि नॅनो उर्फ सूक्ष्म तंत्रज्ञान यांच्या संगमातून एक अत्यंत वेगळ्याच प्रकारचे स्मार्ट जग लवकरच आपल्या आसपास दिसू लागणार आहे. संगणकीय सूक्ष्मतंत्राचा प्रवेश प्रत्येक पैलूमध्ये झालेला आढळेल. किंबहुना, तो तसा असणे हेच आपण गृहीत धरू इतक्या सहजपणे हा बदल होणार आहे. याला 'स्मार्ट कॉँप्युटिंग' म्हटले जाते.

नजिकच्या भविष्यकाळात 'तुमचा हरवलेला चष्मा मोठ्या बेडरूममधल्या पलंगावरील उशीखाली आहे' हे सांगण्याचे काम हे तंत्रज्ञान करेल किंवा एक-दोन किलोम ीटरवर वाहतूक-कोंडीची लक्षणे दिसू लागताच गाडीतील जीपीएस यंत्रणा पर्यायी मार्ग शोधेल. तंत्रज्ञानाची प्रगती होत आहे, तसतशी आपली वाहनेही अधिकाधिक स्मार्ट होत चालली आहेत. उद्याचे वाहन केवळ चालवण्यापुरते मर्यादित न राहता, आपले साथीदार, मदतनीस आणि सुरक्षिततेचे संरक्षक ठरणार आहे. उद्याचे स्मार्ट वाहन हे पूर्णपणे इंटरनेटशी जोडलेले असेल. त्यात कृत्रिम बुद्धिम त्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज आणि सेन्सर टेक्नॉलॉजी यांचा वापर असेल. याव्यतिरिक्त, स्मार्ट वाहने प्रदूषणविरहित असतील. ती सौर किंवा विद्युत ऊर्जेवर चालतील. त्यामुळे पर्यावरणाचे रक्षण होईल आणि हवामान बदलावरही सकारात्मक परिणाम होईल. उद्याचे स्मार्ट वाहन हे अधिक आरामदायक, कार्यक्षम आणि सुरक्षित असेल. ते अधिक वैयक्तिकृत आणि कनेक्टेड असेल आणि अधिक लवचिक आणि अत्याधुनिक प्रवास पर्याय प्रदान करेल. उद्याचे वाहन रचतेच्या बाबतीतही बदलत आहे. त्यात सुटे हलते भाग कमी होऊन सिलिकॉन चिप्स, इंटरनेट ऑफ थिंग्ज, लिथियम बॅटरी असे अवयव असतील. चालकासमोरचा डॅशबोर्ड अधिकाधिक स्मार्ट होऊन चालकाला बॅटरी किती चार्ज आहे, जवळ चार्जिंग स्टेशन कुठे आहे, ट्रॅफिक जाम व वाहतुकीच्या मार्गाचा स्मार्ट सल्ला इत्यादीची इत्यंभूत माहिती देईल.

उद्याचे स्मार्ट वाहन अधिक आरामदायक आणि कार्यक्षम असेल. ती अधिक प्रगत सस्पेन्शन आणि सीटिंग सिस्टीमसह येतील, जी अधिक आरामदायक प्रवास अनुभव प्रदान करतील. त्यात अधिक कार्यक्षम इंजिन असेल आणि ऊर्जा-सक्षम घटकांसह जास्त मायलेज आणि कमी उत्सर्जन देईल. इथे इलेक्ट्रिक, हायब्रीड असे अनेक घटक समाविष्ट असतील. स्मार्ट वाहने इंटरनेट आणि इतर उपकरणांशी सतत जोडलेली राहतील. यामुळे त्यांना रिअल टाइम वाहतूक माहिती, हवामानाचा अंदाज आणि इतर उपयुक्त माहिती मिळत राहील. उद्याचे स्मार्ट वाहन अधिक सुरक्षित असेल. स्वयंचलित ब्रेकिंग, लेन-बदल करण्यात मदत आणि अंधारात दृष्टी या बाबतीत ते चुणूकदार ठरेल. चालक गाडी ठीक चालवत नसेल तर ते अनेक प्रकारे त्याला सूचना देईल. गजर, झटका, समोरील वाहन वेगात उलट येत असेल तर आपोआप स्टिअरिंग वळवणे, अनेक निकटवर्तीयांना आपत्कालीन संदेश पाठवणे आदी गोष्टी करेल. उद्याचे स्मार्ट वाहन अधिक वैयक्तिकृत असतील. ते अधिक वैयक्तिकृत इंटीरियर आणि एक्सटीरियर डिझाइनसह उपलब्ध होईल, जे चालक आणि प्रवाशांच्या आवडीनिवडी पूर्ण करेल. प्रत्येक व्यक्ती वेगळी असल्यामुळे तिच्या वाहनाबद्दलच्या गरजा वेगळ्या असतात. उद्याचे स्मार्ट डिस्प्ले तंत्रज्ञान तुम्हाला स्मार्टफोन स्क्रीन समोर दाखवेल आणि ध्वनी सहाय्यक (व्हॉइस असिस्टंट) तुम्हाला वाहन चालवत असताना संदेश ऐकवेल. त्यातील एआय टूल आपोआप काही निर्णय घेईल. वाहनातील मनोरंजन प्रणाली अधिक प्रगत असेल आणि प्रवाशांना चित्रपट पाहणे, संगीत ऐकणे किंवा ऑनलाइन काम करणे शक्य होईल.

उद्याचे स्मार्ट वाहन वाय-फाय, ब्लूटूथ आणि अधिक प्रगत कनेक्टीव्हिटी वैशिष्ट्यांसह सज्ज असेलच. त्यामुळे अनेक सेवा प्रदान करेल. आपण मागे बसले असल्यास आपल्या समोरील सीट हे वर्क स्टेशन बनेल, तुम्ही मनोरंजन, संगणकाचा वापर अशा अनेक गोष्टी करू शकाल. वाहने एकमेकांशी आणि रस्त्यावरील पायाभूत सुविधांशी संवाद साधू शकतील. यामुळे सुरक्षितता वाढेल आणि वाहतूक व्यवस्थापन अधिक प्रभावी होईल यामध्ये अजून एक प्रवाह असेल तो स्वयंचलित वाहनाचा. सध्या ते प्रगत देशात प्रायोगिक स्तरावर प्रचलित आहे, पण भारतात त्याच्या अनेक समस्या आहेत. सतत बदलणारे रस्ते (आजचा नो एन्ट्री पॉइंट उद्याचा वनवे असू शकतो), कधीही कुठूनही वाहन अथवा प्राणी प्रगट होऊ शकते, अंधारात खड्डे असू शकतात. पुढील काही वर्षांमध्ये त्यावरही उपाय सापडतील, पण दुर्गम, असुरक्षित प्रदेशात स्वयंचलित तंत्र नक्कीच सोयीस्कर असेल. अशा वाहनांमुळे अपघातात घट, इंधनाचा कमी वापर आणि वेळेची बचत होणार आहे. इलेक्ट्रिक वाहने आधुनिक युगातील पर्यावरणपूरक वाहतूक स्रोत म्हणून उदयास आली आहेत. या वाहनांमध्ये पेट्रोल किंवा डिझेलऐवजी विद्युत ऊर्जा वापरली जाते. त्यामुळे प्रदूषण कमी होते आणि पर्यावरणाचे नुकसानही कमी होते. इलेक्ट्रिक वाहन ज्वलन इंजिनाऐवजी इलेक्ट्रिक मोटरवर चालते. त्यामध्ये मोठ्या रिचार्ज करण्यायोग्य बॅटरीमध्ये (किंवा इलेक्ट्रिक सेलच्या पॅकमध्ये) वीज साठवली जाते. इलेक्ट्रिक वाहने खूपच कमी आवाज करतात, उच्च प्रवेग आणि टॉर्क त्यांना आणखी आकर्षक बनवते. महत्वाचे म्हणजे त्यांना व्यावहारिकदृष्ट्या कोणत्याही देखभालीची आवश्यकता नसते.

अलिकडच्या काही वर्षांमध्ये वाहतुकीच्या मोठ्या प्रमाणावर विद्युतीकरणाला राष्ट्रीय प्राधान्य मिळाले आहे. नॅशनल इलेक्ट्रिक मोबिलिटी मिशन प्लॅन २०२० आणि केंद्रीय मंत्रिमंडळाने बॅटरीवर चालणाऱ्या दुचाकी, रुग्णवाहिका, ट्रक आणि तीनचाकी वाहनांसाठी दोन वर्षांच्या कालावधीत १०,९०० कोटी रुपयांच्या ई-ड्राइव्ह योजनेला मंजुरी दिली आहे. त्याअंतर्गत ८८,५०० साइट्सवर चार्जिंगची सुविधा उपलब्ध होईल. गेल्या दशकापासून मात्र हायड्रोजनवर चालणाऱ्या वाहनांवरील संशोधनाला गती मिळाली आहे. या वाहनांचा बोलबाला इलेक्ट्रिक कार्सइतका नसला तरी बीएमडब्ल्यू आणि स्टोलांटिस या मोठ्या कंपन्यांनी याबाबतच्या संशोधन आणि विकास कार्यक्रमांमध्ये मोठी गुंतवणूक केल्याने या क्षेत्राकडे अनेकांच्या नजरा वळल्या आहेत. अनेक देशांनी आपापल्या वाहन उत्पादकांवर कमीत कमी धूर सोडून पर्यावरणाची हानी शक्य तितकी टाळणारी इंजिने (व इंधनेही) शोधण्याचे, बनवण्याचे आणि वापरण्याचे बंधन आता घातले आहे. त्यामुळे वाहन उद्योगाच्या पारंपारिक चित्रात आणि एकंदर रचनेमध्ये मोठे बदल होऊ घातले आहेत. हायड्रोजन कार्स हे त्यातलेच एक महत्त्वाचे पाऊल आहे. ही हायड्रोजन कार चालते कशी हे आपण थोडक्यात वाचू. इथे हायड्रोजन पेट्रोलप्रमाणे, थेट जाळला जात नाही तर त्यातील रासायनिक ऊर्जेचे रूपांतर विजेम ध्ये केले जाते. या विजेवर गाडीची चाके फिरवली जातात. मुख्य म्हणजे या वाहनाच्या एक्झॉस्ट पाइपमधून धूर नाही तर चक्क पाणी बाहेर येते; परिणामी प्रदूषण शून्य!

हायड्रोजन तीन प्रकारे मिळतो. पेट्रोलियमच्या उत्पादन प्रक्रियेतून, कोळशापासून आणि पाणी व सेंद्रीय कचऱ्यातून. 'ग्रीन' म्हणजेच पर्यावरणस्नेही असल्याने या तिसऱ्या प्रकारच्या हायड्रोजनचा वापर या वाहनांसाठी केला जातो. या सर्व नवसंशोधनांकडे पाहताना कोणतेही एक विशिष्ट तंत्रज्ञानच श्रेष्ठ मानून त्याचाच वापर करण्याचा आग्रह धरण्यापेक्षा, सर्वोत्तम विविध तंत्रांचे एकत्रीकरण करून पर्यावरण रक्षणाचा अंतिम हेतू साध्य करणे महत्त्वाचे आहे, असे म्हणता येईल.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## मुळातून शेतकऱ्यांसाठी पाट पाण्याचे आवर्तन सोडले : आ. लंघे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : नेवासा तालुक्याला वरदान ठरलेले मुळा धरणाचे आवर्तन रविवारी (दि.२७) रोजी सायंकाळी सहा वाजता सोडले असल्याची माहिती आमदार विठ्ठलराव लंघे यांनी पत्रकारांशी बोलतांना दिली. आ. लंघे म्हणाले की, काल सायंकाळी सहा वाजता मुळा धरणामधून शेतकऱ्यांसाठी पाट पाण्याचे आवर्तन सोडल्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मि ळाला असल्याचे आ. लंघे यांनी बोलताना सांगितले.

पाटपाण्यासाठी शेतकऱ्यांची नेवासा तालुक्यामध्ये मागणी होत होती. त्याच अनुषंगाने जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्याकडे आ. विठ्ठलराव



लंघे यांनी पाटपाण्याच्या संदर्भात पाठपुरावा केलेला असल्यामुळे हे आवर्तन सोडण्यात आले आहे. आमदार लंघे यांच्या मागणीच्या धर्तीवर काही दिवसांपूर्वी नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी पाटबंधारे विभागाची बैठक बोलावून पाटपाण्याच्या संदर्भात नियोजन केलेले होते. त्या बैठकीदरम्यान आ. लंघे हे या बैठकीला उपस्थित होते.

ना. विखे पाटील यांनी पाटबंधारे अधिकाऱ्यांना आदेश दिले होते की, आमदार लंघे म्हणतील त्याप्रमाणे पाटपाण्याचे नियोजन करा. त्याच अनुषंगाने रविवारी सायंकाळी सहा वाजता मुळा धरणामधून आवर्तन सोडले असल्याची माहिती आ. लंघे यांनी पत्रकारांशी बोलतांना दिली. या पाटपाण्यामुळे ऊस, बाजरी, मका, भुईमूग तसेच फळबागांना यामुळे मोठा दिलासा मिळणार असल्याचे आ. लंघे यांनी सांगितले.

जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखेपाटील आणि नेवासा विधानसभेचे आ. विठ्ठलराव लंघे यांची राजकीय गट्टी असल्यामुळे आमदारांची मागणी पालकमंत्री विखे पाटील यांच्या दरबारात क्षणार्धात पुर्ण होत असल्यामुळे भर उन्हाळ्यात पाण्याची टंचाई जाणवली गेली असल्याचे आता शेतकऱ्यांतून उघडपणे बोलले जात आहे.

## माहेगाव देशमुखच्या दिव्यांगांना पाणी जारचे वाटप : विवेक कोल्हे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष युवानेते विवेक कोल्हे यांच्या वाढदिवसानिमित्त एक अभिनव सामाजिक उपक्रम राबवण्यात आला. नुकत्याच झालेल्या पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर विवेकभैय्या कोल्हे यांनी वाढदिवसाचा सार्वजनिक उत्सव साजरा न करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या सामाजिक भावनेने प्रेरित होऊन दिव्यांग बांधवांसाठी पाण्याच्या जार वाटपाचा उपक्रम प्रथम लोकनियुक्त माजी सरपंच बाळासाहेब दत्तात्रय पानगव्हाणे यांच्या पुढाकाराने करण्यात आला.

दिव्यांग बांधवांना शुद्ध पाण्याच्या जारचे वाटप करून त्यांच्या दैनंदिन जीवनात छोटासा पण मोलाचा हातभार लावण्याचा प्रयत्न झाला आहे. समाजातील दुर्बल घटकांबद्दल आपुलकी व सहकार्याचा संदेश या माध्यमातून देण्यात आला.

यावेळी अमृत संजीवनीचे चेअरमन पराग संधान साहेब, बाळासाहेब पानगव्हाणे, माजी संचालक दत्तात्रय पानगव्हाणे, माजी व्हा. सोपानराव पानगव्हाणे, वसंतराव



पानगव्हाणे, एकनाथराव पानगव्हाणे, उत्तम राव पानगव्हाणे, अशोकराव पानगव्हाणे, पी. आर. काळे, संतोष जाधव, विजय कदम, मारुती कदम, नितीन कदम, विजयराव पानगव्हाणे, प्रवीण पानगव्हाणे, सतीश पानगव्हाणे, रवींद्र पानगव्हाणे, राहुल पानगव्हाणे, उमेशराव पानगव्हाणे, विकास पानगव्हाणे, विलास जाधव, शशिकांत पानगव्हाणे, नामदेव पानगव्हाणे, रमेश भगुरे, वारोबा रोकडे, दिलीप पानगव्हाणे, आदेश पानगव्हाणे, अक्षय पानगव्हाणे, रमेश पानगव्हाणे, आप्पासाहेब पानगव्हाणे, दादासाहेब पानगव्हाणे, भास्कर पानगव्हाणे, बाळासाहेब काळे, विलास काळे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### दिग्गज मान्यवरांनी दिल्या शुभेच्छा

दिग्गज मान्यवरांकडून विवेक कोल्हे यांच्या निर्णयाचे मनापासून कौतुक केले व सामाजिक जाणीवेतून साजऱ्या झालेल्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांच्या दीर्घायुष्याच्या आणि यशस्वी वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या.

### कोल्हे परिवार नेहमी सेवाव्रत

सेवा हाच धर्म या भावनेने दिव्यांग बांधवांचे मोठे काम कोल्हे परिवार सातत्याने करत आहे. हजारो दिव्यांग बांधवांना आरोग्य तपासणी आणि उपचारांसाठी संजीवनी उद्योग समूह आणि कोल्हे परिवार नेहमी सेवाव्रत असल्याने हा उपक्रम आदर्श शुभेच्छा ठरला आहे.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

## शासनाच्या सेवा ऑनलाईन करा

तर १२५ सेवा ऑनलाइन आहेत पण त्या कॉमन पोर्टलवर उपलब्ध नाहीत आणि म्हणून शासनाच्या सर्व विभागांना १५ ऑगस्ट पर्यंत सर्व सेवा ऑनलाईन करा. १५ ऑगस्ट पर्यंत शासनाच्या सर्व सेवा ऑनलाईन करा.जो शासनाचा विभाग १५ ऑगस्ट पर्यंत झाली नाही त्या विभागातील प्रत्येक सेवेकरिता दर दिवशी प्रत्येकी एक हजार रुपयांचा दंड आकारला जाईल असेही ते म्हणाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, लोकशाहीत लोकांसाठी कर्तव्य भावनेने काम करायचे असते. लोकसेवा हा केवळ कायदा नाही तर ती एक उदात्त भावना आहे असं आपण म्हणतो या वाक्याला लोकसेवा हक्क आयोगाने खरा अर्थ मिळवून दिला आहे.हा कायदा म्हणजे खऱ्या अर्थाने लोकशाहीची गंगोत्री आहे. नाविन्यपूर्ण उपक्रम वर्धा,यवतमाळ आणि कोल्हापूरच्या जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या जिल्ह्यात राबवले त्यांचा आताच सत्कार करण्यात आला.अशाच प्रकारे इतर जिल्ह्यातही काम केले जावे.खर तर जिथे समाजाला त्यांचे सर्व हक्क आणि अधिकार त्यांना सेवा दिल्या जातात तिथे प्रगती अटळ असते.हा कायदा प्रशासन व नागरिकांमधला विश्वासाचा एक पूल आहे असं म्हटलं तर वावग ठरणार नाही आणि म्हणून सर्वसामान्य जनतेच्या सक्षमीकरणाचा हा पाया अधिक मजबूत होईल आणि या अधिनियमच्या माध्यमातून लोकांना तात्काळ सेवा मिळतील असेही ते म्हणाले. मुख्य सचिव सुजाता सौनिक म्हणाल्याकी, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जनतेला ऑनलाईन सेवा देण्यासाठी आयोग नक्कीच प्रभावी अंमलबजावणी करेल. मायक्रोसॉफ्ट सोबत देखील आपण यासाठी करार केला आहे.महाराष्ट्र डिजिटल गव्हर्नन्स मध्ये देशासाठी एक आदर्श मॉडेल ठरेल असेही त्या म्हणाल्या.

## मोरवाडी धरणासाठी पाठपुरावा करणार : थोरात

सभासदांचा स्पष्ट निर्णय होता की कारखाना शेतकरी विकास मंडळाकडेच राहायला हवा. आणि तुमच्या सर्वांच्या पाठिंब्यामुळे आज कारखान्याची निवडणूक बिनविरोध झाली, असे सांगत लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी कार्यकर्त्यांचे आभार मानले. ही एकजूटच आपली खरी ताकद आहे. पुढेही आपल्याला अशाच प्रकारे संघटित राहून प्रत्येक आव्हानाला सामोरे जावे लागणार आहे. मोरेवाडी धरणाच्या गरजेवरही भर दिला. तुमच्या भागातील पाणी प्रश्न सोडविण्यासाठी मोरेवाडी येथे एक छोटेसे धरण व्हावे, ही माझी कल्पना होती. सर्वेक्षण देखील झाले होते. जर आपले सरकार सत्तेत आले असते, तर हे काम मार्गी लागले असते, असे ते म्हणालेफ पिंपळगाव खांडसारखे मोठे धरण होऊ शकते, तर मोरेवाडी येथे का नाही? आता आपल्या सर्वांच्या दृष्टीने मोरेवाडी येथे धरण होणे अत्यावश्यक आहे. वेळप्रसंगी धरणासाठी आग्रह धरा. त्यांना श्रेय गेले तरी मला हरकत नाही, कारण माझा हेतू फक्त धरण व्हावे हाच आहे. पुढच्या शंभर पिढ्या तरी सुखी होतील, असे त्यांनी ठामपणे सांगितले. कारखान्याच्या प्रत्येक जागेसाठी पाच-पाच अर्ज दाखल झाले होते. निवडणूक बिनविरोध होणे सोपे नव्हते. मात्र अशा कठीण परिस्थितीतही आपण सर्वांनी एकमेकांवर विश्वास ठेवून, संवाद साधून, अखेर बिनविरोध निवडणूक साध्य केली, असे सांगून माजी मंत्री थोरात यांनी कार्यकर्त्यांचे विशेष कौतुक केले. यासाठी तुम्ही सर्वांनी दाखवलेली साथ महत्वाची आहे. याच एकजुटीमुळे आपल्या कारखान्याचा आलेख आजपर्यंत चढताच राहिला आहे, असेही त्यांनी नमूद केले. यापुढे ऊस उत्पादन वाढवण्यासाठी नवनवीन प्रयोग करणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी साकुर पठार भागातील विविध गावांमधील सभासद शेतकरी व युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अवैध कत्तलखाने उद्ध्वस्त करा

सोनवणे, संगमनेर शहर पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख, तालुका पोलीस निरीक्षक देविदास ढुमणे आणि घारगावचे पोलीस निरीक्षक विलास पुजारी आदी पोलीस अधिकारी उपस्थित होते. पोलिस स्थानकमध्ये आलेल्या तक्रारदार यांच्याबरोबर कर्मचारी यांचे वर्तन सभ्यपणाचे असावे, उद्धटपने वागू नये, अशा सूचनाही दिल्या आहेत. आ. खताळ म्हणाले की, मागील काही दिवसापूर्वी शहरात सुरू असणारे सर्व अनाधिकृत कत्तलखाने उद्ध्वस्त केले होते. पोलिसांनी मागील आठवड्यात तीन ते चार ठिकाणी कत्तलखान्यावर कारवाया केल्या आहेत. यापुढे अशा ठिकाणी निदर्शनास आल्यावर ज्या हद्दीत असतील तेथील प्रशासनाने, नगरपालिका प्रशासनाने नोटीसा देवून शहरात सुरू असणारे अनधिकृत कत्तलखाने उद्ध्वस्त करण्यात यावे, असे निर्देश पोलीस अधिकाऱ्यांना दिले आहेत.

## ८३ तलाव गाळमुक्त होणार

प्रभूवाडगाव, बेलगाव, ढोरजळगावने, बोधेगाव, ठाकूर पिंपळगाव, चापडगाव, माळेगाव, मुरमी, हसनापुर, राक्षी, वरूर खुर्द, भगुर, सालवडगाव व पाथर्डी तालुक्यातील करोडी, जिरेवाडी, जवखेडे खा, भिलवडे, येळी, खरवंडी, मोहटे, हात्राळ, निपाणी जळगाव, चिंचपुर इजदे, सांगवी, चितळी, तीनखडी, मढी, जवखेडे दुमाला, कोरडगाव, पिंपळगाव टप्पा इत्यादी गावातील बंधारे पाझर तलावातील गाळ काढण्यासाठी कामांना प्रशासकीय मान्यता दिली असून अशासकीय संस्थाचे ठरावानुसार त्यांना काम वाटप करण्यातस मान्यता दिली आहे.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11

# सहकारी संस्थांमध्ये पठार भागाची नेहमीच मला साथ

## माजी मंत्री बाळासाहेब थोरात; आंबीखालसा येथे स्नेहसंवाद मेळावा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** संगमनेर तालुक्यातील सहकारी संस्थामध्ये पठारभागाने नेहमीच मला साथ दिली आहे. मग

> राहुरी तालुक्यात मोठ्याप्रमाणात ऊस आहे. पण त्यांची काय अवस्था आहे हे आपण बघीतले पाहिजे. आपली संगमनेरची बाजारपेठ खूप मोठी आहे. हे सर्व चक्र कारखान्यामुळे फिरत असते. प्रत्येक वेळेस अचूक व योग्य निर्णय घेण्याचे काम आपण आत्तापर्यंत केले आहे. यामुळे आपली प्रगती झाली आहे. बाहेरच्या शेतकऱ्यांचा विश्वास आपल्यावर आहे. म्हणून आपण ऊस आणत आहे. कारण त्या शेतकऱ्यांचा देखील विश्वास आपल्यावर आहे.
>
> **– बाळासाहेब थोरात, माजी मंत्री**

यामध्ये. साखर कारखाना, दूध संघ, शेतकी संघ, जिल्हा परिषद असो वा जिल्हा बँक प्रत्येक ठिकाणी मला मिळालेली साथ आजही मी विसरू शकत नाही, असे उद्गार माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केले.

आंबीखालसा येथील लक्ष्मी मंगल कार्यालयात सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या सभासद व युवक हितचिंतकांसाठी आयोजित स्नेहसंवाद मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी जेष्ठ संचालक पांडुरंग घुले, लक्ष्मण पावडे, सभापती शंकर खेमनर, अजय फटांगरे, बबन कुऱ्हाडे, अरूण वाघ, विजय राहणे, सुरेश कान्होरे, दादापाटील आहेर, राजेंद्र आहेर, गणेश सुपेकर, दत्तात्रय गडगे, बापू जाधव, संपत आभाळे, ज्ञानदेव गडगे, गणेश सुपेकर, सुनंदाताई भागवत, प्रियंका गडगे, भाग्यश्री नरवडे, प्रमोद कुरकुटे, दिनेश पावडे यांच्यासह आदी उपस्थित होते.

माजी मंत्री थोरात म्हणाले कि, सहकार चळवळ केवळ उद्योगांची रचना नाही, तर ती शेतकऱ्यांची एकजूट आणि आत्मसम्मानाचे प्रतीक आहे. जेव्हा साखर कारखाना किंवा दूध संघाच्या माध्यमातून गावगावात प्रगती झाली, तेव्हा त्यामागे पठारभागाच्या माणसांचे योगदान ठळकपणे दिसून आले.''आजही जेव्हा नव्या पिढीला सहकार क्षेत्रात काम करायची संधी मिळते, तेव्हा त्यामागे जुनी पिढी घडवून ठेवलेली परंपरा प्रेरणास्थान ठरते.




दरम्यानच्या काळात विधानसभेची निवडणूक झाल्यानंतर विरोधकांना असे वाटत होते की आता साखर कारखान्याचे काय होणार अशा अनेक अफवा देखील उठल्या होत्या पण अशा कठीण परिस्थित आपण कारखान्याची निवडणूक बिनविरोध केली. हे करणे सोपे नव्हते मात्र आपण ते करून दाखवले आहे. अनेकांनी मन मोठे करून आपले अर्ज मागे घेतले. याचा त्रासही मला खूप झाला आता आपण अतीशय चांगली घडी बसवली आहे.

आता ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी एकरी शंभर टनांपर्यंत ऊसाचे उत्पादन घेतले आहे. यामुळे शेतकऱ्यांना जास्तीत जास्त भाव देता येईल आणि आपल्याही बाहेरून ऊस आणण्याची गरज पडणार नाही. असेही शेवटी थोरात यांनी सांगितले आहे. दरम्यान कार्यक्रमाचे प्रास्ताविक अजय फटांगरे यांनी केले सूत्रसंचालन बाळासाहेब कुऱ्हाडे तर आभार वकील सुहास आहेर यांनी मानले.

# कोल्हार येथे साई सच्चरित् पारायण सोहळा

**जनता आवाज वृत्तसेवा**




**कोल्हार :** श्रीक्षेत्र कोल्हार येथे गुरुवार, दि. १ मे ते शुक्रवार, दि. ९ मे २०२५ दरम्यान साई सूर्योदय ग्रुप, तीन चारी आयोजित श्री साई सच्चरत् पारायण सोहळ्याचे कै. विठ्ठलमामा निबे वस्ती, तीन चारी, राजुरी रोड, कोल्हार बु येथे भव्य आयोजन करण्यात आले आहे.

दरम्यान दररोज सायंकाळी ६ ते ९ या वेळेत साईंची आरती व ग्रंथ वाचन होणार आहे. दरवर्षीप्रमाणे बापूसाहेब महाराज बोऱ्हाडे तिसगाववाडी हे यावर्षीच्या पारायण सोहळ्याचे व्यासपीठ चालक आहेत. दरम्यान दि. ९ मे रोजी सकाळी ७.३० वा. ग्रंथ अवतरणिका व भव्य पालखी मिरवणूक होणार असल्याचे आयोजन कर्त्यांकडून सांगण्यात आले आहे.

पारायण सोहळ्याची यंदाचे हे १४ वे वर्ष आहे. नवीन पारायण करताना ग्रंथ वाटप करण्यात येईल, तसेच जुन्या पारायण करतांनी आपले ग्रंथ बरोबर घेऊन यावेत, असे आवाहन यावेळी करण्यात आले. दरम्यान दि. ९ मे रोजी पारायण सांगतेच्या दिवशी झी टॉकीज फेम हभप रोहिणीताई परांजपे यांचे काल्याचे किर्तन होणार असुन त्यानंतर महाप्रसादाचे वाटप होणार आहे. भाविक भक्तांनी पारायण वाचनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन साई सूर्योदय ग्रुप तीनचारीकडून विजय डेंगळे यांनी केले आहे.

# पाथर्डी तालुक्यात चोरट्यांचा सुळसुळाट

## दोन ठिकाणी घरफोड्या तर एक ठिकाणी दुकानाची चोरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पाथर्डी तालुक्यातील माळीबाभुळगाव गावातील वाळके कुटुंबीयांच्या घरात दरवाजा उघडा असल्याचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी लाखोंच्या सोन्याचा ऐवजासह रोख रक्कम चोरून नेल्याची घटना घडली आहे. यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

भाऊसाहेब नानाभाऊ वाळके (वय ६५) यांनी पाथर्डी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. २६ एप्रिल २०२५ रोजी रात्री कुटुंबीयांनी जेवणानंतर उष्णते मुळे दरवाजा उघडा ठेवून घराबाहेर पडवीत झोप घेतली होती. पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास, पत्नी रुख्मिणी वाळके यांना जाग आल्यावर त्यांनी घरातून पळणारा संशयित व्यक्ती पाहिला. तत्काळ घराची पाहणी केली असता, कपाटे उचकटलेली दिसली आणि घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम गायब असल्याचे निदर्शनास आले.

या घटनेत सोन्याचे नेकलेस, नथ, पोत, झुंबर,अंगठ्या, बाळ्यांचे दागिने चांदीचे कडे,वाळे, दडुळ्या विविध प्रकारचे लहान मुलांचे दागिने रोख रक्कम सुमारे ९५ हजार रुपये एकूण साडे दहा तोळे सोन्याचे दागिने, चौदा भार चांदीचा दागिने असा मालमत्ता वाळके यांच्या घरातून चोरी गेला आहे. दरम्यान, गावातील अनिल नाथा नन्नवरे यांच्या घरातही अशीच चोरी झाली आहे. या घटनेत सुमारे सव्वा तोळे सोन्याचे दागिने चोरी झाले आहे.

पाथर्डी मार्केटयार्डमध्ये दुकान फोडून ७५०० रुपये चोरी साहील संजयकुमार लुनावत यांच्या कृषी उत्पन्न बाजार समितीतील (मार्केटयार्ड) किराणा दुकानाचे छत उचकटून अज्ञात चोरट्याने ७५०० रुपयांची रोकड चोरून नेली. २६ एप्रिल रोजी रात्री दुकान बंद करून लुनावत हे घरी गेले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी दुकान उघडताना चोरीचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी पाथर्डी पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आली आहे.

# आ. काळे करणार मंगल कलश रथयात्रेचे स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने राज्यात महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथ यात्रेचे आयोजन करण्यात आले असून ही मंगल कलश रथ यात्रा बुधवार (दि.३० एप्रिल) रोजी कोपरगाव तालुक्यातून शिर्डीत दाखल होणार आहे.

या मंगल कलश रथयात्रेचे शिर्डी येथील शासकीय विश्राम गृह येथे सकाळी १० वाजता आ. काळे स्वागत करणार असल्याची माहिती कोपरगाव तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष चारुदत्त सिनगर यांनी दिली आहे.

> धार्मिक उत्सवाबरोबरच भक्तीच्या संगमातून संस्कृतीचा सन्मान करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने या मंगल कलश रथ यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या मंगल कलश रथयात्रेच्या स्वागतास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.
>
> **– चारुदत्त सिनगर**



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने ६५ व्या महाराष्ट्र दिनानिमित्त गौरवशाली महाराष्ट्र महोत्सवाचे मुंबई येथे आयोजन करण्यात आले आहे. आपल्या महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाचा, सामाजिक समरसतेचा आणि एकात्मतेचा संदेश देणारी हि मंगल कलश रथ यात्रा राज्यभर उत्साहात सुरु आहे. या मंगल कलशमध्ये गडकिल्ले, ऐतिहासिक वास्तूंची माती, नद्यांचे पाणी एकत्रित करण्यात येणार असून कोपरगाव मतदार संघातून वाहणाऱ्या गोदावरी नदीचे पवित्र जल व विविध धार्मिक तीर्थ क्षेत्राच्या पावन भूमीतील माती सजविलेल्या मंगल कलशातून मुंबई येथे नेण्यात येणार आहे.

# स्व. सुकाळकरांना मरणोत्तर पुरस्कार प्रदान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासे :** संतांच्या सहवासातुन परमार्थिक अधिष्ठानाचे परिपुर्ण उदाहरण म्हणजे सुकाळकर आक्का त्याचे जीवन संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेले अशा शब्दात गौरव करताना स्व. आशादेवी सुकाळकर यांना आदर्श माता पुरस्काराने मरणोत्तर गौरव. पुरस्कार हभप बद्रीनाथ तनपुरे यांनी प्रदान केला

दगडवाडीच्या पवित्र भूमीत, जिथे भक्तीची बीजे रोवली जातात आणि परमार्थाच्या वाटेवर चालणाऱ्या संतांच्या चरणस्पर्शाने भूमीही धन्य होते, अशा पुण्यधामात एक अत्यंत भावपूर्ण सोहळा पार पडला. संतांच्या सहवासातून परमार्थिक अधिष्ठानाची मूर्तीमंत प्रचिती देणाऱ्या स्व. आशादेवी सुकाळकर यांना वै. रुक्मिणी माता तनपुरे आदर्श माता पुरस्काराने मरणोत्तर सन्मानित करण्यात आले. बद्रीनाथ महाराज तनपुरे आणि सत्यभामा तनपुरे यांच्या हस्ते हा पुरस्कार स्नेह, श्रद्धा आणि स्मरणगंधाने



दरवळत प्रदान करण्यात आला. त्यांच्या आशीर्वादमय भाषणात त्यांनी नमूद केले की, संसारात राहूनही जे परमार्थ साधतात, त्यांचं जीवनच इतरांसाठी दीपस्तंभ ठरतं. स्व. आशादेवी यांचे जीवन म्हणजे संतविचारांचे मूर्तिमंत दर्शन होतं.

ह.भ.प. ब्रह्मचारी अमोल महाराज, ह.भ.प. शंकर महाराज ससे, ह.भ.प. महादेव महाराज वांढेकर, डॉ. भाऊसाहेब घुले, सेवानिवृत्त कृषी अधिकारी शेषरावजी भुसारी, उद्योजक सुरेश शिंदे, उद्योजक राजेंद्र पाचे, बाळासाहेब कोलते, बाबासाहेब सुकाळकर, सरपंच सुभाष शिंदे यांचा गौरवशाली सहभाग होता.

यावेळी डॉ. भास्करराव सुकाळकर, सहदेव वाढवणे, प्रा. दशरथ खोसे, विजयराव कावरे, भगवान सुकाळकर, भागवत महाराज सुकाळकर, पंकज सुकाळकर, राहुल सुकाळकर, प्रणित सुकाळकर, भारत सुकाळकर, भागवत शिंदे, शरदराव सुकाळकर, शरदराव उगले, हेमंत कवडे, उद्योजक बाळासाहेब सुकाळकर, संदीप राऊत, आबासाहेब तोडमल, झुंबरराव गुंजाळ आदी उपस्थित होते.

# पहलगाम हल्ल्याचा दिव्यांग बांधवांकडून निषेध

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे हिंदू पर्यटकांवर दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्याच्या विरोधात संगमनेर शहर आणि तालुक्यातील दिव्यांग बांधवांनी जोरदार घोषणाबाजी करत जाहीर निषेध व्यक्त केला.

संगमनेर येथील शासकीय विश्रामगृह येथे दिव्यांग सहाय्यसेनेचे जिल्हाध्यक्ष जालिंदर लहामगे यांनी दिव्यांग बांधवांना एकत्रित करत जम्मू काश्मीरमध्ये हिंदू पर्यटकांवर झालेल्या या हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला. या हल्ल्यात प्राण गमावलेल्या पर्यटकांप्रती सद्भावना व्यक्त केली.

> जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथील ज्या दहशतवाद्यांनी हिंदू पर्यटकावर हल्ला केला. हा हल्ला घडवून आणणाऱ्या पाकिस्तानी दहशतवाद्यांचा पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा हे नक्कीच खात्मा करतील यात शंका नाही. परंतु येथून पुढे यासारखे दहशतवादी हल्ले होणार नाही, यासाठी सर्वांनी एकत्रित येण्याची नितांत गरज आहे.
>
> **– अमोल खताळ, आमदार**

यावेळी दिव्यांग बांधवांनी संपूर्ण देशाला एकतेचा अन देशभक्तीचा संदेश दिला. दहशतवाद्यांच्या कृत्यांचा निषेध करत सर्व देशवासीयांना सजग व सशक्त राहण्याचे आवाहन दिव्यांग सहाय्य सेनेचे जिल्हाध्यक्ष जालिंदर लहामगे, महिला आघाडी तालुकाध्यक्ष पौर्णिमा आढाव, शिवाजी खुळे, अविनाश ढमाले, राजेंद्र ढमाले, विष्णू गणोरे, पुरुषोत्तम जोशी, यांच्यासह आदी दिव्यांग बांधवांनी केले. जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथील हल्ल्याच्या निषेधार्थ शासकीय विश्रामगृहावर दिव्यांग बांधव आंदोलन करत होते. त्यावेळी आ. अमोल खताळ हे शासकीय विश्रामगृहात आले असता त्यांनी दिव्यांग बांधवांना पाहताच आपली गाडी थांबवली आणि दिव्यांग बांधवांमध्ये सहभागी होऊन त्यांच्या भावना जाणून घेतल्या.

# पद्मश्री विखेंमुळे शेतकऱ्यांच्या विकासाला चालना: म्हसे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आश्वी:** महाराष्ट्रामध्ये अनेक सहकारी संस्था सहकारी तत्त्वावर उभ्या राहिल्या. दूध संघ, सहकारी बँका, को-ऑपरेटिव्ह सोसायटी, शेती संस्था, या प्रकारच्या संस्था निर्माण झाल्या. सहकारी कारखाने उभे राहिले. यातून ग्रामीण जीवन आणि शेतकरी यांच्या विकासाला चालना मिळाली व अनेक गावे समृद्ध झाली यामागे मोलाचे योगदान हे सहकाराचे जनक पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांचे होते असे प्रतिपादन पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे संचालक विजयराव म्हसे यांनी केले.

संगमनेर तालुक्यातील आश्वी बुद्रुक येथे सहकाराचे जनक पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांच्या ४५ व्या स्मृतीदिनानिमित्याने मानवंदना देताना संचालक विजयराव म्हसे बोलत होते.

याप्रसंगी प्रवरा बँकेचे संचालक माधवराव गायकवाड, अजय ब्राम्हणे, संजय गांधी, माजी चेअरमन अशोकराव म्हसे, सोसायटी चेअरमन आण्णासाहेब जऱ्हाड, अनिल म्हसे, अनिल गायकवाड यासह जनसेवा मंडळाचे तसेच भाजपा कार्यकते उपस्थित होते. विजयराव म्हसे म्हणाले की, अनेक खडतर परिस्थितीतून हा कारखाना सहकारी तत्त्वावर उभा राहिला. अहिल्यानगर जिल्ह्यातील आजूबाजूच्या खेड्यातील व गावातील लोकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याचं आणि त्यांच्या जीवनामध्ये आनंद निर्माण करण्याचे काम या सहकारी तत्त्वावरील साखर कारखान्यामुळे शक्य झालं.

# कोल्हेंच्या वाढदिवसानिमित्त आदिवासी मुलांना शालेय वस्तुचे वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अभ्यासु युवा अध्यक्ष व राज्य सहकारी साखर संघाचे संचालक विवेक कोल्हे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन कोपरगाव तालुका औद्योगिक वसाहतीचे उपाध्यक्ष व माजी जिल्हा परिषद सदस्य केशव भवर यांनी शिरसगाव सावळगाव जिल्हा परिषद

> कोपरगांव औद्योगिक वसाहतीचे अध्यक्ष व जिल्हा सहकारी बँकेचे संचालक या नात्याने त्यांनी उद्योग, शेती, अर्थकारण, बँकींग, शिक्षण, सहकार आदि क्षेत्रात काम करून विकासावर सातत्याने भर दिलेला आहे. त्यांच्या वाढदिवसाची आठवण म्हणून आदिवासी मुला मुलींना शालेय वस्तु वाटप केल्या. त्यात शिरसगांव सावळगांवसह पुर्व भागातील प्रत्येक सहकारी व्यक्तींची साथ लाभली आहे.

शाळेतील आदिवासी मुला-मुलींना शालेयपयोगी वस्तु व गणवेशाचे वाटप केले. प्रारंभी जम्मु काश्मीर मधील पहलगाम येथे अतिरेक्यांच्या भ्याड हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या २८ देशबांधवांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

केशव भवर म्हणाले की, युवानेते विवेक कोल्हे यांनी पहलगाम येथे झालेल्या अतिरेकी हल्ल्याच्या पार्श्वभुमीवर यंदा वाढदिवस साजरा न करण्याची भुमिका घेत या हल्ल्यात निरपराध व्यक्तींना आपले प्राण गमवावे लागले. त्याबद्दल शोक व्यक्त करून श्रध्दांजली वाहिली. युवानेते विवेक कोल्हे यांनी अल्पावधीत येसगांवपासुन ते राज्यपातळीपर्यंत व जागतिक स्तरावर कार्यरत



असलेल्या इफको या संस्थेत आपल्या कामकाजाचा ठसा उमटविलेला आहे. संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे व माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली व माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांच्या विचारांचा वारसा जपत युवानेते विवेक कोल्हे यांनी सामाजिक वाटचाल सुरू केली आहे.

# हिंदू-मुस्लिम ऐक्य दाखवून दहशतवादाला उत्तर देवू

## ॲड. सुरेंद्र खर्डे पाटील; कोल्हार येथे पहलगाम हल्ल्याचा व्यापाऱ्यांसह सर्वधर्मीयांकडून निषेध सभा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार :** कोणीही राजकारण न करता किंवा हिंदू-मुस्लीम असा वाद न करता आपण सर्वांनी जागरूक राहून हिंदू-मुस्लिम ऐक्य दाखवून या अतिरेक्यांविरुद्ध सरकारच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहून दहशतवादाला सडेतोड उत्तर देवू, असे प्रतिपादन कोल्हार बुद्रुकचे माजी सरपंच ॲड. सुरेंद्र खर्डे पाटील यांनी केले.

भारताचे नंदनवन समजल्या जाणाऱ्या जम्मू आणि काश्मीर खोऱ्यातील पहेलगाम येथील निसर्गरम्य परिसरामध्ये पाकिस्तानी दहशतवाद्यांकडून २८ निरपराध हिंदू पर्यटकांवर जो भ्याड हल्ला झाला त्यामध्ये निष्पाप नागरिकांचे बळी गेले आहेत. आपल्या मुला-बाळांसमोर आपल्या पतीला कोणी गोळ्या घालत असेल तर यापेक्षा दुर्दैव आणि दुःख जगामध्ये दुसरं कोणतं नाही. या भ्याड हल्ल्याचा निषेध करण्यासाठी कोल्हार येथे व्यापारी तसेच सर्वपक्षीय सर्वधर्मीय निषेध सभेचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान निषेध सभा होईपर्यंत गावात कडकडीत बंद पाळण्यात आला होता.

याप्रसंगी कोल्हार बुद्रुकचे माजी सरपंच ॲड. सुरेंद्र खर्डे पाटील यांनी भाजप सरकारचा चांगलाच समाचार घेतला. गेली अकरा वर्ष तुमचे सरकार असून देखील दर सहा महिने किंवा एक वर्षाने मोठा अतिरेकी हल्ला होत असल्याचे निरीक्षण त्यांनी यावेळी नोंदविले. तसेच हे आपल्या गुप्तचर यंत्रणेचे मोठे अपयश असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

पद्मश्री विखे पाटील कारखान्याचे संचालक स्वप्निल निबे म्हणाले की, आपल्याला धोका पाकिस्तानपासून नसून आपल्यातीलच असलेल्या गद्दारांपासून आहे व हे गद्दार कोण हे ओळखण्यासाठी सदैव जागरुख रहा.

कोल्हार टपरीधारक संघटनेचे अध्यक्ष व अपंग संघटनेचे तालुकाप्रमुख कुमार जंगम

> नागरिकांनी शहानिशा केल्याशिवाय सोशल मीडियावर कोणतेही मेसेज व्हायरल करू नये, की ज्यामुळे समाज माध्यमांवर त्याचे वाईट परिणाम होतील. मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना शहिदांचा दर्जा द्यावा. भारत सरकारला करून त्यांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त केली.
>
> **– ॲड. सुरेंद्र खर्डे पाटील**

यांनी पहलगाम येथील भ्याड अतिरेकी हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला तसेच यामागे मोठा कूटनीती डाव असून भारतभरामध्ये हिंदू-मुस्लिम वाद निर्माण करण्याचा कुटील डाव असल्याचे सांगून आपले हिंदू-मुस्लिम ऐक्य या अतिरेक्यांना दाखवून त्यांचा डाव हाणून पाडावा, असे आवाहन सर्व हिंदू-मुस्लिम बांधवांना केले.

तसेच कोल्हारमधील सर्व मुस्लिम बांधवांनी विशेष करून नमाजच्या वेळेस तसेच दिवसभर हाताला काळी पट्टी बांधून

> पाकिस्तान पुरस्कृत अतिरेक्यांना भारत सरकारने चांगलाच धडा शिकवून त्यांना यमसधनी पाठवावे किंवा वेळप्रसंगी पाकिस्तानला देखील नेस्तनाबूत करून या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढावा तसेच ज्यामुळे गावातील वातावरण दूषित होईल अशा खोट्या अफवा पसरू नये व कोणीही या अफवांवर विश्वास ठेवू नये.
>
> **–इलियासभाई शेख,** ज्येष्ठ नागरिक

निषेध केल्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले. तसेच या भ्याड हल्ल्यातील मृतांना श्रद्धांजली वाहिली.

याप्रसंगी कोल्हार भगवतीपुरचे सरपंच दत्तात्रय राजभोज, उपसरपंच प्रकाश खर्डे, देवालय ट्रस्टचे उपाध्यक्ष साहेबराव दळे, पद्मश्री विखे कारखान्याचे संचालक ज्ञानेश्वर खर्डे, संभाजी देवकर, शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे जिल्हा उपप्रमुख अनिल बांगरे, व्यापारी पतसंस्थेचे अध्यक्ष संजय शिंगवी,



श्रीकांत बेंद्रे, श्याम गोसावी, अरुण जोशी, सचिन शिरसाट, केतन लोळगे, अरुण बोरुडे, कॉम्रेड सुरेश पानसरे, बब्बाभाई शेख, जावेद सर, सुनील बोरुडे आदींनी आपले मनोगत व्यक्त केले.

तर कोल्हार भगवतीपुरचे सरपंच दत्तात्रय राजभोज, उपसरपंच प्रकाश खर्डे, देवालय ट्रस्टचे विश्वस्त विजय निबे, विखे कारखान्याचे संचालक बापूसाहेब कडसकर, अनिल हिरानंदानी, धनंजय दळे, पंढरीनाथ खर्डे, नागपूर पशु व मत्स्य विद्यापीठाचे कार्यकारी सदस्य ऋषिकेश खांदे, अक्षय मोरे, साईनाथ खर्डे, आबा खर्डे, गोरक्ष खर्डे, मयूर कडसकर, स्वप्निल लोखंडे, अतुल राका, आशुतोष बोरसे, आसिफ शेख, शोभा लोखंडे आदी तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. भविष्यात असे हल्ले होऊ नये, म्हणून या घटनेची सखोल चौकशी व्हावी व त्वरित प्रतिबंधात्मक पावले उचलावे, या मागणीचे निवेदन पत्र लोणी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक देवराम वनवे यांच्याकडे कोल्हार भगवतीपुर ग्रामस्थ व व्यापाऱ्यांच्या वतीने देण्यात आले.

# ‘तिफन’ मुळे शेतकऱ्यांचे जीवन सुसह्य होईल

## मुकुल वार्षनेय; फुले कृषी विद्यापीठात ‘तिफन २०२५’ कार्यक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : भारतातील कृषी अभियंते हे जगामध्ये सर्वोच्च स्थानी असून इतर शाखेच्या अभियंत्यांपेक्षा ते सरस कामगिरी करीत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच रिमोट सेन्सर्स या तंत्रज्ञानाचा उपयोग सर्व क्षेत्रात होताना दिसत आहे. या तंत्रज्ञानाचा उपयोग कृषी क्षेत्रामध्ये जर केला तर भारतीय शेतीमध्ये अमुलाग्र बदल होतील. तिफन स्पर्धेमधील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या यंत्रांमुळे शेतकऱ्यांचे जीवन सुसह्य होईल, असे प्रतिपादन जॉन डियर प्रा. लिमिटेडचे कार्पोरेट अफेयर्सचे संचालक मुकुल वार्षनेय यांनी केले.



महात्मा फुले कृषी विद्यापीठामध्ये महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी व सोसायटी ऑफ ऑटोमोटिव्ह इंजिनियर्स, इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय पातळीवरील तंत्रज्ञान तिफन २०२५ या स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते. तीन दिवसांपासून सुरू असलेल्या ‘ट्रॅक्टरचलित भाजीपाला पुनरलागवड यंत्रे’ या विषयावरील या स्पर्धेचा समारोपप्रसंगी झालेल्या कार्यक्रमात श्री. मुकुंद वार्षनेय अध्यक्षस्थानावरून बोलत होते. याप्रसंगी या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सोसायटी ऑफ ऑटोमोटिव्ह इंजिनियर्स इंडियाचे अध्यक्ष डॉ. गोविंदराज नागराजन उपस्थित होते. यावेळी कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रवींद्र बनसोड, कमिन्सचे अध्यक्ष श्री. अभिजीत फडके, सोसायटी ऑफ ऑटोमोटिव्ह इंजिनियर्स इंडियाचे श्री. अजय अग्रवाल, सोसायटी ऑफ ऑटोमोटिव्ह इंजिनियर्स इंडियाचे ऑफ हायवे अध्यक्ष डॉ. कृष्णांत पाटील, श्री.रवींद्र सिंग, कार्यक्रमाचे संयोजक श्री. संदीप राजपूत व अल्टेर कंपनीचे प्रमुख श्री.बी. एस. रमेशा उपस्थित होते. यावेळी डॉ. गोविंदराज नागराजन आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की, या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी बनवलेले डिझाईन तसेच नवकल्पना या शेतकऱ्यांच्या फायद्याच्या आहेत. सध्याचे हे युग नवीन तंत्रज्ञानाचे असून ड्रोन तंत्रज्ञानामुळे शेतीमधील कठीण कामे सुलभ होतील. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संदीप राजपूत यांनी तिफन २०२५ च्या प्रवासाविषयी माहिती दिली. याप्रसंगी डॉ. कृष्णांत पाटील यांनी पुढील वर्षी होणाऱ्या तिफन २०२६ या स्पर्धे चे समन्वयक म्हणून शितल कोलते व सहसंयोजक म्हणून श्री. रोहन जगदाळे यांच्या नावाची घोषणा केली. या कार्यक्रमासाठी कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विविध विभागांचे विभाग प्रमुख, प्राध्यापक व कर्मचारी तसेच संयोजक कमिटीचे पदाधिकारी पराग चौधरी, सुशांत कदम, संदीप बुरली, ऋषिकेश शिंदे, कुलदीप सिंगल, अजय अग्रवाल, विनयकुमार इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवानी खंडार व यशोदा भणगे यांनी तर आभार कृषी यंत्र व शक्ती विभाग प्रमुख डॉ. सचिन नलावडे यांनी मानले.

‘तिफन २०२५’ या स्पर्धेतील विविध पारितोषिकांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये प्रथम विजेता संघ ठरला पुणे येथील पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालयाचा संघ यांना १,००,०००/- आणि सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. पहिल्या उपविजेतेपदाचे बक्षीस ७५,०००/- संगमनेर येथील अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संघास सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. द्वितीय उपविजेतेपदाचे बक्षीस ५०,०००/- लुधियाना येथील पंजाब कृषी विद्यापीठाचा संघ व पुणे येथील सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संघास विभागून देण्यात आले.

# पळवे खुर्द येथे गाळमुक्त धरण योजनेचा शुभारंभ

**जनता आवाज वृतसेवा**

**पारनेर** : पळवे खुर्द गावातील तलावांच्या खोलीकरणाच्या कामाचा शुभारंभ श्री काळभैरवनाथ यात्रा व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या शुभमुहर्तावर शिर्डी संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्षनाथ गाडीलकर व उपकार्यकारी अधिकारी शेखर शेलार यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

गत वर्षी येथे टाटा मोटर्स, नाम फाउंडेशन यांच्या विद्यमाने जलसंधारणाचे भरीव काम झाल्याने याचा पाणी साठवण्यासाठी चांगल्या प्रकारे फायदा जाणवला, त्यामुळे ग्रामस्थ समाधानी आहेत. यंदाही हे काम



सुरू झाल्यामुळे ग्रामस्थ समाधानी आहेत. यावेळी सरपंच जनाबाई तरटे, वंदना गाडीलकर, चेअरमन संदीप देशमुख, उपसरपंच दत्ता गाडीलकर, रोहिदास नवले, तात्यासाहेब देशमुख, संजय तरटे, हरिभाऊ भांडलकर, पंडीत देशमुख, नवनाथ पाचारणे, नानाभाऊ गाडीलकर, संपत कुटे, दत्ता जगताप, प्रसाद तरटे, अंबादास तरटे मेजर, सुभाष साबळे सर, विलास तरटे मेजर, बाजीराव पाचारणे, अर्जुन गाडीलकर, रवींद्र नवले, विलास गाडीलकर, पोपट तरटे, अमोल सोनवले, राजेंद्र शेळके, सतीश शेळके, ऋषी तरटे, सचिन शेळके, अमोल तरटे, सनी गवळी व ग्रामसेविका कविता व अमोल शेळके आदी उपस्थित होते.

# कोल्हार येथे शिवरायांचे स्मारक उभारणार

## डॉ. सुजय विखे पाटील; उंबरी बाळापूर येथे अश्वारूढ पुतळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आश्वी** : पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतुन शिर्डी येथील पाटबंधाऱ्याच्या जागेवर १० कोटी रुपये खर्च करून महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजाचे भव्य स्मारक तसेच शिवतिर्थ लवकरच उभे करणार आहोत. उंबरीबाळापूर येथे पुतळ्याचे काम पुर्ण झाले असुन लवकरच कोल्हार येथील पुतळाचे काम पुर्ण करणार असल्याची माहिती डॉ. सुजय विखे यांनी दिली. उंबरी बाळापूर (ता. संगमनेर) येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा बसवण्यात आला. त्याप्रसंगी



डॉ. सुजय विखे पाटील बोलत होते. यावेळी पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर करखान्याचे संचालक विजयराव म्हसे, रंगनाथ उंबरकर, माजी पंचायत समिती सदस्य सरूनाथ उंबरकर, युवा नेते संपतराजे भुसाळ, निलेश निर्मळ, संजय उंबरकर, मोहीत गायकवाड, सागर दिघे, प्रकाश उंबरकर, लहानभाऊ उंबरकर, किरण भुसाळ, सुभाष भुसाळ, अनिल भुसाळ, आशिष शेळके, विवेक डोखे ग्रामस्थ उपस्थित होते. डॉ. सुजय विखे म्हणाले की, उंबरीबाळापूर येथील ग्रामस्थांनी तसेच युवकांनी छत्रपती शिवाजी महाराजाचे पुतळा बसवण्याचे स्वप्न बंधितले व ते विखे परीवारा मार्फत पुर्ण करण्याचे भाग्य मला लाभले. यासाठी सर्व तरूण सहकाऱ्यांचे आपण आभारी असल्याचे डॉ. सुजय विखे म्हणाले.

उंबरीबाळापूर गावातील अंतर्गत वादामुळे गेल्या अनेक वर्षापासुन महाराजाचा अश्वारूढ पुतळा बसविण्याचे काम रखडले होते. महाराजांच्या पुतळ्याची तुलना ही पैशात होऊ शकत नाही. शिवाजी महाराज म्हणजे एक विचार आहे. केवळ महाराजांच्या पुतळा गावमध्ये बांधून उपयोग होणार नाही. तर त्याच्या विचारांचे गावातील तरूणांनी जोपासावे. या कार्यक्रमाला कॉंग्रेस, शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी इतर सर्व पक्षातील कार्यकते उपस्थित राहिले. यामुळे जिल्ह्यात एक वेगळा आर्दश निर्माण केला असल्याचे डॉ. सुजय विखे यांनी सांगितले.

# मख़दूम सोसायटी तर्फे पुस्तके वाटप



**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर** : मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीच्या वतीने सावित्रीबाई फुले उर्दू प्राथमिक कन्या शाळेत जागतिक पुस्तक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात मखदूम सोसायटीचे अध्यक्ष आबिद दुल्हे खान यांनी उद्घाटनपर भाषण केले.

आणि शालेय विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके वाटली आणि विद्यार्थ्यांना पुस्तकांचे महत्त्व, पुस्तके वाचण्याची उपयुक्तता आणि सध्याच्या युगात विद्यार्थ्यांचे पुस्तकांपासूनचे अंतर या विषयांवर मार्गदर्शन केले. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात पण पुस्तकांना महत्त्व आहे.

त्यामुळे पालक व शिक्षकांनी विद्यार्थयांमध्ये पुस्तकांशी जवळीक निर्माण केली पाहिजे असे सांगितले. यावेळी स्त्री शिक्षणाचे जनक महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमात शाळेचे मुख्याध्यापक नौशाद सय्यद, असलम पटेल, यास्मिन शेख, फरजाना शेख, शाहीन शेख, काझी मुमताज, शेख सुलताना, शेख हीना यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन असलम पटेल यांनी केले. तर आभार नौशाद सैय्यद यांनी मांनले.

# उंदिरगांव येथे भव्य रक्तदान शिबीरास प्रतिसाद



**जनता आवाज वृत्तसेवा**

**वडाळा महादेव** : श्रीरामपुर तालुक्यातील उंदिरगांव येथे डॉ. जोंधळे नित्यसेवा ब्लड बँक श्रीरामपूर यांच्या सौजन्याने भव्य रक्त दान शिबीराचे आयोजन करण्यात आले. सदर शिबीराचे उद्घाटन अशोक सहकारी साखर कारखाना माजी चेअरमन सुरेश पाटील गलांडे यांच्या हस्ते करण्यात आले. उंदिरगांव येथे महंत रामगिरी महाराज यांच्या अधिपत्याखाली अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा चालू असुन सप्ताह स्थळी रक्त दान शिबीराचे आयोजन करण्यात आले. नित्य सेवा ब्लड बँकेच्या परिचारीका सायली गायकवाड, सिध्दी खेमणर, सिद्धांत घाडगे, वैभव गोरमाळी यांनी शिबीरात मार्गदर्शन केले. सदर शिबीर यशस्वीतेसाठी सुनिल गुंड, शिवाजी आप्पा पाऊलबुध्दे आरोग्य मित्र भीमराज बागुल, बाळासाहेब आढाव, गेणु भालदड, आदींनी परिश्रम घेतले. शिबीरामधे किशोर खरात, शरद भालदंड, रविन्द्र निपुंगे आदिंनी भाग घेतला. रक्तदान करणाऱ्या युवकांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानीत करण्यात आले. यावेळी आप्पासाहेब ताके, जितेन्द्र गोलवड, बबनराव नाईक, जिल्हा परिषद माजी सदस्य बाळासाहेब नाईक, अशोक गलांडे आदी उपस्थित होते.

# निलेश उचाळे कुस्ती स्पर्धेत भारतात तिसरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : पारनेर तालुक्यातील शिरापुर येथील कुस्तीगीर निलेश मच्छिंद्र उचाळे याने दिल्ली छत्रसाल मैदानावर झालेल्या राष्ट्रीय शालेय कुस्ती स्पर्धेत ७७ किलो रौप्य पदक मिळवुन भारतात तिसरा क्रमांक मिळविला. पहिलवान निलेश उचाळे याच्या या राष्ट्रीय स्पर्धेतील यशाबद्दल पारनेर तालुक्यात त्याचे अभिनंदन होत आहे.



निलेशने आतापर्यंत विभागीय राज्य पातळी व देशपातळीवरील विविध कुस्ती स्पर्धेत यश मिळविले आहे.निलेश चे शिक्षण अळकुटी साईनाथ विदयालय येथे झाले असून कुस्तीचे भाळवणी येथील गुरुकुल कुस्ती संकुल वस्ताद एनआयएस परिक्षक गणेश जाधव, जिल्हा परिषदचे माजी सभापती पैलवान मधुकर उचाळे व इतरांचे मार्गदर्शन लाभले. निलेश ची घरची परिस्थिती अत्यंत प्रतिकूल असून त्याने कुस्तीत हे मोठे व अनोखे यश मिळवले .

# उंदीरगाव शाळा म्हणजे संस्काराचे गुरुकूल

## आरती उपाध्ये; जि. प. शाळेतील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ



**जनता आवाज वृत्तसेवा**

**वडाळा महादेव** : महात्मा फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, कर्मवीर भाऊराव पाटील आदिंनी ग्रामीण शिक्षणासाठी सर्वात मोठे योगदान दिले, अशा पार्श्वभूमीवर उंदीरगाव येथील जि. परिषदेची शाळा म्हणजे ज्ञानाचे आणि संस्काराचे गुरुकुलच वाटावे इतके सुंदर आणि पवित्र हे ज्ञानमंदिर वाटते, असे विचार वाचन संस्कृती प्रतिष्ठान, श्रीरामपूरच्या सचिव, योगकेंद्र सदस्या आरती गणेशानंद उपाध्ये यांनी व्यक्त केले. श्रीरामपूर तालुक्यातील उंदीरगाव येथील जिल्हा परिषद शाळेत आयोजित चौथी विद्यार्थी शुभेच्छा समारंभाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून आरती उपाध्ये बोलत होत्या.

अध्यक्षस्थानी अशोक सहकारी साखर कारखान्याचे संचालक विरेश गलांडे पाटील होते. प्रारंभी श्रीसरस्वतीमाता प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मुख्याध्यापक गजानन धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमाचे स्वागत, प्रास्ताविक ज्येष्ठ शिक्षक विनोद राऊत यांनी केले. ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती कांताताई सूर्यवंशी उर्फ कांताताई किसनराव वमने यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा प्रितीताई टाक, शेतकरी संघटनेचे तळमळीचे नेते प्रकाश ताके पाटील, उपसरपंच ज्ञानेश्वर बांद्रे पाटील आदिंनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत शाळेचे कौतुक केले.

अध्यक्षीय भाषणात विरेश गलांडे म्हणाले, आरती उपाध्ये यांचे विद्यार्थ्यांना छान मार्गदर्शन झाले, या शाळेत शिकलेले, ज्यांनी निराधार अवस्थेत उच्च शिक्षण घेतले, प्राध्यापक, लेखक झाले, त्यांच्या सूनबाई कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या लाभल्या आहेत, याविषयी मला खूप आनंद वाटतो, असे सांगून चौथीच्या विद्यार्थ्यांना त्यांनी शुभचिंतन व्यक्त केले. सूत्रसंचालन विनोद राऊत सर यांनी केले तर लिनाताई देवरे यांनी आभार मानले.

# सभापतीपद निवडीचा आ. शिंदेपुढे तिढा

## घुले, शेलार, कि अन्य कोण? एकमत होईना

जनता आवाज वृत्तसेवा

कर्जत : नगरपंचायतच्या नगराध्यक्षपदी कोणाची वर्णी लागणारे यावर आता चर्चेला उधाण आले आहे. रोज एकाचे नाव पुढे येत आहे. यामुळे राऊत यांच्या विरोधात बंड केलेल्या नगरसेवकांमध्ये पदावरून एकमत होत नसल्याची सध्या जोरदार चर्चा कर्जत तालुक्यामध्ये सुरू आहे.

आणि विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या समोर पेच निर्माण झाला आहे. रोहिणी घुले, छाया शेलार की तिसरा अन्य कोणी? नगराध्यक्ष होणार याविषयी उत्सुकता निर्माण झाली आहे. नगराध्यक्ष पदासाठी मोठी चुरस निर्माण झाली आहे. १३ नगरसेवक एक मताने सहलीला गेले असले तरी, आता नगराध्यक्ष पदाच्या





खुर्चीवर कोण विराजमान होणार? यासाठी मोठी चुरस निर्माण झाली आहे. या तेरा नगरसेवकांमधील अनेक जण इच्छुक झाले आहेत. मलाच संधी मिळावी, अशी मागणी अनेकांनी केली आहे. यामुळे विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या समोर देखील पेच निर्माण झाला आहे.

हा तिढा सोडवण्यासाठी रविवारी रात्री पुन्हा एकदा समन्वय समितीची बैठक राम शिंदे यांनी बोलवली असून त्यासाठी पक्षातील काही निवडक नेत्यांना देखील त्यांनी आमंत्रित केले असल्याची माहिती मिळाली आहे. माजी नगराध्यक्ष उषा राऊत यांच्या विरोधात १३ नगरसेवकांनी बंड केलेले आहे. या बंडातून सर्व नगरसेवकांनी राऊत यांच्यावर अविश्वास ठराव आणला. परंतु राऊत यांनी आपला राजीनामा दिल्याने अविश्वास ठरवायची वेळ आली नाही. त्यामुळे विरोधकांचा डाव असफल झाला. त्यासाठी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांना मंत्रिमंडळाकडून राज्यामध्ये थेट कायदा बदल करावा लागला. जर कायदा बदल केला नसता तर मात्र राऊत यांची सरशी झाली असती. २८ तारखेपासून नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू होत आहे. दोन मे रोजी नगराध्यक्षांची निवड केली जाणार आहे. सध्या नगराध्यक्ष पदासाठी रोहिणी घुले व छाया शेलार यांच्यामध्ये मोठी चुरस असल्याची माहिती मिळाली आहे. असे असले तरी देखील नगराध्यक्ष पदासाठी इतरही काही जण इच्छुक झाले आहेत. दुसरीकडे भारतीय जनता पक्षाचा निष्ठावंत कार्यकर्त्यांची विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्याकडे पक्षाचा नगराध्यक्ष व्हावा, अशी मागणी आहे.

### रोहित पवार यांच्या गटामध्ये शांतता

दरम्यान दुसरीकडे आमदार रोहित पवार यांच्या गटामध्ये मात्र शांतता आहे. माजी नगराध्यक्ष नामदेव राऊत हे चमत्कार करण्यासाठी ओळखले जातात. त्यांच्याकडे चार नगरसेवक आहेत. त्यामुळे त्यांच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. मात्र सध्या तरी त्यांच्या कोर्टामध्ये शांतता दिसून येत आहे. संपर्क केला असता श्री. राऊत यांनी आम्हाला संधी मिळालेली होती. त्यामुळे आम्ही समाधानी आहोत. आमची कोणावर नाराजी नाही. सध्या आम्ही फक्त काय घडत आहे हेच पाहणार आहोत. असे श्री. राऊत म्हणाले.

# दिपाली सूर्यवंशी यांची शासकिय सेवेत निवड



**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील पद्मश्री विखे पाटील कला, विज्ञान, आणि वाणिज्य महाविद्यालयातील पर्यावरण शास्त्र विभागात कार्यरत असणाऱ्या प्रा. दिपाली दत्तात्रय सूर्यवंशी यांची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पर्यावरण व हवामान बदल विभाग महाराष्ट्र शासन येथे कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक पदावर निवड झाली अशी माहीती महाविद्यालयाचे कॅम्पस संचालक डॉ. आर. ए. पवार यांनी दिली.


दिपाली सुर्यवंशी या महाविद्यालयामध्ये सहाय्यक पदावर कार्यरत असून त्या पर्यावरण शास्त्र विभागाच्या माजी विद्यार्थिनी आहेत त्यांना प्राचार्य डॉ. प्रदीप दिघे, कॅम्पस संचालक डॉ. आर. ए. पवार, उपप्राचार्य डॉ. शांताराम चौधरी, डॉ. अनिल वाबळे, डॉ. छाया गलांडे, प्लेसमेंट विभागाचे प्रमुख डॉ. मनोज परजणे, डॉ. हरिभाऊ दुबे आणि आप्पासाहेब शेळके. विभाग प्रमुख डॉ. अरुणा झिने यांचे मार्गदर्शन मिळाले.

महाविद्यालयाने दिलेले प्रोत्साहन त्याचबरोबर संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या प्रवरा स्पर्धा परीक्षा केंद्राच्या माध्यमातून मिळालेली माहिती यामुळे मला हे यश मिळवता आले. प्रवरा शैक्षणिक संकुलाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांबरोबरच येथील कर्मचाऱ्यांना देखील पुढील शिक्षणासाठी नेहमीच प्रोत्साहन दिले जाते, असे दिपाली सुर्यवंशी यांनी सांगितले.




# ही बद्धकोष्ठता आहे का?

**विचारा प्रश्न**




माझ्या तीन वर्षांच्या मुलाला गेल्या पंधरा दिवसांपासून शौचाला त्रास होत आहे. याबाबत आम्ही डॉक्टरांचा सल्ला घेतला. त्यांनी काही औषधं लिहून दिली आहेत. माझ्या मुलाला बद्धकोष्टतेचा त्रास आहे का?

उत्तर : तुमचा मुलगा नुकताच शाळेत जायला लागला असेल तर त्याला बद्धकोष्टतेचा त्रास असू शकतो. आईवडिलांपासून लांब जाण्याचा ताण आणि शाळेतल्या स्वच्छतागृहांमधली अस्वच्छता लहान मुलांमधल्या बद्धकोष्टतेला कारणीभूत ठरते. तुमच्या मुलाला दररोज सकाळी ठरलेल्या वेळी शौचालयात बसवा. त्याला आहारातून फायबर द्या. तसंच भरपूर पाणी प्यायला लावा. फळांचे रस, ताक असे पदार्थही देता येतील. डॉक्टरांच्या संपर्कात राहा. तुमच्या मुलाची नियमित तपासणी करून घ्या. यामुळे इतर काही समस्यांचं निदान होऊ शकेल. सौम्य लॅक्सेटिव्ह तसंच शौच मऊपडण्यासाठी दिलेली औषधं साधारण दोन आठवड्यांपर्यंत दिली तर तुमच्या मुलाला बरं वाटेल.

# १३० कोटी उच्च रक्तदाब ग्रस्त

**आरोग्य विशेष**

जगात सर्वाधिक मृत्यू हार्टअटॅकमुळे होतात. मधुमेह, खराब कोलेस्टेरॉल, लठ्ठपणा, धूम्रपान अशी अनेक कारणे हृदयविकाराच्या झटक्याला कारणीभूत आहेत; पण सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे उच्च रक्तदाब अर्थात हायपरटेंशन. नुकताच युरोपियन महासंघाच्या 'न्यूज मेडिकल लाईफ सायन्सेस' या वैद्यकीय जर्नलमध्ये एक अहवाल प्रसिद्ध झाला आहे. त्यानुसार, लहानपणापासूनच उच्च रक्तदाब सुरू होतो. जगभरात सुमारे १३० कोटी लोकांना उच्च रक्तदाबाचा त्रास असल्याचेही या अहवालात नमूद करण्यात आले आहे. जगात सर्वाधिक मृत्यू हार्टअटॅकमुळे होतात. मधुमेह, खराब कोलेस्टेरॉल, लठ्ठपणा, धूम्रपान अशी अनेक कारणे हृदयविकाराच्या झटक्याला कारणीभूत आहेत; पण सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे उच्च रक्तदाब अर्थात हायपरटेंशन. नुकताच युरोपियन महासंघाच्या 'न्यूज मेडिकल लाईफ सायन्सेस' या वैद्यकीय जर्नलमध्ये एक अहवाल प्रसिद्ध झाला आहे. त्यानुसार, लहानपणापासूनच उच्च रक्तदाब सुरू होतो. जगभरात सुमारे १३० कोटी लोकांना उच्च रक्तदाबाचा त्रास असल्याचेही या अहवालात नमूद करण्यात आले आहे. गेल्या काही वर्षांत लठ्ठपणाची समस्याही झपाट्याने वाढली आहे. या समस्येने कोणत्याही वयाच्या, जातीच्या, रंगाच्या व्यक्तीशी भेदभाव केलेला नाही. पूर्वी लठ्ठपणाची समस्या फक्त तरुण किंवा वृद्धांमध्येच दिसून येत असे. पण आता लहान मुलांमध्येही लठ्ठपणा वाढत असल्याचे दिसून येत आहे.



जागतिक आरोग्य संघटनेच्या म्हणण्यानुसार, २०२२ मध्ये जगभरात पाच वर्षांपेक्षा कमी वयाची सुमारे ३.७ कोटी मुले लठ्ठपणाने ग्रस्त होती. संपूर्ण जगात लठ्ठपणाने ग्रस्त असणाऱ्या पाच ते १९ वर्षे वयोगटातील मुलांची संख्या ३९ कोटी आहे. १९९० च्या तुलनेत २०२२ मध्ये मुलांमध्ये लठ्ठपणाची प्रकरणे चार पटीने वाढली आहेत. जागतिक आरोग्य संघटनेने याविषयी चिंता व्यक्त केली आहे. लठ्ठपणामुळे अनेक गंभीर आजार होऊ शकतात, हे या चिंतेमागील कारण आहे. जागतिक आरोग्य संघटनेने लठ्ठपणाला 'महामारी' म्हणून घोषित केले आहे. याचा अर्थ असा की, हा आजार खूप वेगाने पसरत असून लोक मोठ्या प्रमाणात त्याला बळी पडत आहे. यासंदर्भात बोलताना दिल्लीचे वरिष्ठ फिजिशियन डॉ. बॉबी दिवाण सांगतात की, लठ्ठपणा हा केवळ उच्चरक्तदाबाच्या संबंधातच दिसून आला नाही, तर हे बहुतांशी असंसर्गजन्य रोगांचे कारणही आहे. त्यामुळे हृदयविकार आणि कर्करोगाचा धोका वाढण्याची शक्यता असते.

# सॅनिटरी उत्पादनामुळे मेंदूला इजा

**आरोग्य चर्चा**

अमेरिकेतील 'केस वेस्टर्न रिझर्व्ह युनिव्हर्सिटी, स्कूल ऑफ मेडिसिन' इथल्या एका टीमने मेंदूच्या आरोग्यास हानी पोहोचवणाऱ्या काही सामान्य घरगुती रसायनांच्या धोक्यांबद्दल इशारा दिला आहे.

फर्निचरपासून केसांच्या रंगापर्यंतच्या उत्पादनांमध्ये आढळणारी अनेक रसायने मल्टिपल स्क्लेरोसिस आणि ऑटिझम स्पेक्ट्रम सारख्या मेंदूविकारांना कारणीभूत ठरू शकतात. त्यामुळे अनेक रसायने असणाऱ्या वस्तू वापरताना अधिक काळजी घेण्याची गरज आहे. 'नेचर न्यूरोसायन्स जर्नल'मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात सुचवण्यात आले की, काही घरगुती वस्तूंमध्ये वापरण्यात येणारी रसायने मेंदूच्या ऑलिगोडेंड्रोसाइट्सवर थेट परिणाम करतात. सोप्या शब्दात याला एक विशेष प्रकारचा संरक्षक स्तर समजा, जो नसांभोवती संरक्षणात्मक इन्सुलेशन तयार करतो. ऑलिगोडेंड्रोसाइट्स खराब होतात तेव्हा न्यूरॉन्सच्या संरक्षणात्मक थराला नुकसान होते. यातूनच पुढे मल्टिपल स्क्लेरोसिस आणि इतर मेंदूरोग होऊ शकतात.

संशोधकांनी १८०० पेक्षा अधिक रसायनांचे विश्लेषण केले, जे वेगवेगळ्या कारणांनी आणि माध्यमांद्वारे आपल्या संपर्कात येऊ शकतात. अनेक सॅनिटरी उत्पादने किंवा घरगुती वस्तूंमुळे डोळे, नाक, घसा किंवा डोकेदुखी यासारख्या



अवयवांसंबंधीच्या आरोग्याच्या समस्या वाढू शकतात. या उत्पादनांमध्ये अस्थिर सेंद्रिय संयुगासह अनेक घातक रसायने असतात. अशी रसायने खोलीच्या तापमानानुसार द्रव ते वायूमध्ये बदलू शकतात. अशा स्थितीत साफसफाई करताना व्हीओसी आणि इतर रसायनांमुळे श्वसनाचा त्रास, ॲलर्जी आणि डोकेदुखीचा धोका वाढतो. दमा किंवा श्वसनाचा त्रास असणाऱ्यांसाठी ही रसायने जास्त धोकादायक असतात.

एअर फ्रेशनर, साफसफाईची उत्पादने, डिटर्जंट आणि डिशवॉशिंग द्रव, ड्राय क्लीनिंग केमिकल्स, फर्निचर आणि फ्लोअर पॉलिश अशा उत्पादनांपासून सावध राहण्याची गरज आहे. अमोनिया असणाऱ्या कोणत्याही क्लिनरमध्ये ब्लीच किंवा कोणतेही ब्लीच उत्पादन कधीही मिसळू नका. असे केल्याने श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो.

# फुफ्फुसाच्या कॅन्सरविषयी...

**व्याधी-विकार**

फुफ्फुसाचा कॅन्सर हा अत्यंत गंभीर स्वरूपाचा विकार आहे. या कॅन्सरचा रूग्ण वाचण्याची शक्यता कमी असते. धूम्रपान हे या कॅन्सरचं महत्त्वाचं कारण मानलं जातं. बराच काळपर्यंत फुफ्फुसाच्या कॅन्सरचं निदान न झाल्यास गुंतागुंत वाढू शकते. या कॅन्सरमुळे वर्षभरात जगात १.३७ दशलक्ष मृत्यू होतात.

**विकारामागील कारणं**

सिगारेटच्या माध्यमातून



होणारं तंबाखूचं सेवन फुफ्फुसासाठी हानीकारक असतं. सिगारेट न ओढणारी व्यक्ती वरचेवर त्या धुराच्या संपर्कात येत असेल तर तिलाही हा विकार जडू शकतो. सिगारेटच्या धुराच्या सततच्या संपर्कामुळे फुफ्फुसाच्या कॅन्सरची शक्यता २४ पटींनी वाढते. रॅडोन वायू हे सुद्धा फुफ्फुसाच्या कर्करोगाचं महत्त्वाचं कारण ठरू शकतं. रॅडोन वायू जमिनीतून वातावरणात पसरतो. तसंच विहिरीचं पाणी आणि बांधकामात वापरल्या जाणाऱ्या साहित्यातूनही या वायूची निर्मिती होते. अभ्रकाचे कण फुफ्फुसाच्या कर्करोगाला कारणीभूत ठरू शकतात. अभ्रकाच्या संपर्कात येणाऱ्या व्यक्तींना फुफ्फुसाचा कर्करोग होण्याची शक्यता अनेक पटींनी जास्त असते. यासोबतच हवेचं प्रदूषण, फुफ्फुसाचे विकार यामुळेही हा रोग होऊ शकतो.

**व्याधीची लक्षणं**

सुरूवातीच्या काळात फुफ्फुसाच्या कॅन्सरची लक्षणं न दिसल्यामुळे या विकाराचं निदान व्हायला वेळ लागतो. श्वास घ्यायला, गिळायला त्रास होणं, सततचा खोकला, खोकल्यातून रक्त पडणं, छातीत दुखणं, धाप लागणं, निमोनिया, वजन कमी होणं, स्वभावात बदल होणं, अशक्तपणा, भूक मंदावणं अशी लक्षणं दिसून येतात.

**प्रकार**

स्मॉल सेल लंग कॅन्सर आणि नॉन स्मॉल सेल लंग कॅन्सर असे फुफ्फुसाच्या कर्करोगाचे दोन प्रकार आहेत. ट्युमरच्या आकारावरून या दोन प्रकारांमधला फरक ओळखला जातो. एससीएलसी हा आक्रमक प्रकार आहे. हा कॅन्सर वेगाने पसरतो. धूम्रपानामुळे हा कॅन्सर होतो. फुफ्फुसाच्या कॅन्सरपैकी २० टक्के हा कॅन्सर असतो. इतर अवयवांमध्ये पसरल्यानंतर त्याचं निदान होतं. त्यामुळे तो खूप घातक ठरतो. ८० टक्के फुफ्फुसाचे कॅन्सर हे एनएससीएलसी असतात. त्याचेही काही उपप्रकार आहेत.

**निदान आणि उपचार**

फुफ्फुसाच्या कॅन्सरच्या निदानासाठी वेगवेगळ्या चाचण्या केल्या जातात. रूग्णाचा वैद्यकीय इतिहास विचारला जातो. शारीरिक तपासणी, छातीची क्ष किरण चाचणी, सीटी, एमआरआय, पेट, बोन असे स्कॅन केले जातात. कॅन्सरच्या इतर प्रकारांप्रमाणे फुफ्फुसाच्या कॅन्सरवरही केमोथेरेपी, रेडिओथेरेपी आणि शस्त्रक्रिया या उपचारपद्धती आहेत.

# मोबाईल खिशात ठेवल्यामुळे...

**आपण कुठे चुकतो?**

मोबाईल फोनशिवाय आपलं पान हलत नाही. चोवीस तास स्मार्टफोन बाळगणारे लोक आहेत. पुरूष मंडळी मोबाईल फोन खिशात ठेवतात. पण यामुळे आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो. खिशात ठेवलेला स्मार्टफोन वायफायशी जोडलेला असेल तर त्यातून होणाऱ्या किरणोत्सर्गाचं प्रमाण दोन ते सात पटींनी अधिक असतं.




फोनमधून बाहेर पडणारा किरणोत्सर्ग आणि ट्यूमरची वाढ यांचा जवळचा संबंध असल्याचं निदर्शनाला आलं आहे. तसंच किरणोत्सर्गामुळे डीएनएची रचनाही बदलू शकते. प्रजननक्षमतेवर तसंच हृदयाशी संबंधित समस्याही निर्माण होऊ शकतात.

पँटच्या खिशात ठेवलेल्या स्मार्टफोनमुळे हाडांची घनता कमी होऊशकते. मागचा खिसा धोकादायक नाही असं तुम्हाला वाटत असलं तरी ते तितकंसं खरं नाही. यामुळे किरणोत्सर्ग पाठीपर्यंत पोहोचतो आणि पाठीशी संबंधित समस्या निर्माण होऊशकतात. तसंच मागच्या खिशात ठेवलेला फोन सांभाळण्यासाठी आपण चुकीच्या पद्धतीने बसतो. याचाही वाईट परिणाम होऊ शकतो. मोबाईल फोन शरीरापासून लांब ठेवणं हा धोका टाळण्याचा एकमेव उपाय आहे. रात्री झोपताना मोबाईल शरीरापासून लांब ठेवा. तसंच झोपण्याआधी किमान तासभर मोबाईल बघू नका.

# प्रोस्टेट कर्करोगाचा धोका ओळखा

**सेलिब्रिटी फिटनेस**

येत्या काही वर्षांत जगभरात प्रोस्टेट कर्करोगाचे प्रमाण झपाट्याने वाढू शकते. एका अभ्यासानुसार, २०२० पर्यंत दरवर्षी १४ लाख लोक या आजाराने ग्रस्त होते. २०४० पर्यंत हाच आकडा २९ लाखांपर्यंत वाढू शकतो. पुढील वीस वर्षांत जगभरात या आजारामुळे मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या ८५ टक्क्यांनी वाढण्याची शक्यता आहे.





२०२३ मध्ये तीन लाख ७५ हजार लोकांचा मृत्यू झाला असून २०४० पर्यंत ही संख्या सात लाखांपर्यंत वाढू शकतो. तथापि, तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, मृत्यूची वास्तविक संख्या जास्त असू शकते कारण गरीब आणि विकसनशील देशांमध्ये हा रोग अनेकदा आढळून येत नाही किंवा डेटा रेकॉर्ड केला जात नाही. प्रोस्टेट हा पुरुष प्रजनन प्रणालीचा एक लहान आणि मऊ भाग आहे. त्याचा आकार अक्रोड किंवा पिंग-पाँग बॉलच्या बरोबरीचा आहे. त्याचे वजन सुमारे ३० ग्रॅम असते. ही ग्रंथी पुरुषाचे जननेंद्रिय आणि मूत्राशय यांच्यामध्ये असते. मूत्र आणि वीर्य शरीराबाहेर वाहून नेणारी नळी (मूत्रमार्ग) प्रोस्टेटच्या मध्यभागी जाते. ही नळी मूत्राशयातून मूत्र बाहेर काढण्याचे काम करते. प्रोस्टेट या नळीभोवती असल्यामुळे यासंबंधीच्या समस्यांमुळे लघवी करण्यास त्रास होऊ शकतो. वय वाढते तसे अनेक पुरुषांमध्ये प्रोस्टेट ग्रंथीचा आकार थोडा वाढतो. यामुळे लघवीची नळी आकुंचन पावते. त्यामुळे लघवीला त्रास होऊ शकतो. काही वेळा प्रोस्टेट ग्रंथी वाढल्यामुळे लघवीचा मार्ग बंद होतो. त्यामुळे लघवी थांबते आणि मूत्राशयात जमा होते. त्यामुळे हा अवयव पाण्याच्या टाकीसारखे बनतो जिथून लघवी बाहेर पडत राहते. परंतु मूत्राशयात सुमारे एक ते दीड लिटर लघवी साठून राहते. अशी परिस्थिती प्रोस्टेट कर्करोगाला जन्म देते. प्रोस्टेट कर्करोगाच्या सुरुवातीच्या टप्प्यात कोणतीही लक्षणे दिसत नाहीत. रोग वाढतो तेव्हा मात्र अनेक समस्या उद्भवू शकतात.

# डोकेदुखीकडे दुर्लक्ष नको

**आरोग्यवेध**

जागतिक आरोग्य संघटनेच्या म्हणण्यानुसार डोकेदुखी ही अत्यंत सर्वसाधारण अशी तक्रार आहे. जगभरातले बहुसंख्य लोक वरचेवर अशी तक्रार करत असतात. अनेकदा डोकेदुखी तीव्र स्वरूपाची असते तर काही वेळा वेदनाशामक औषधं घेऊन ती बरी होते. पण सततची डोकेदुखी गंभीर आजाराचं लक्षणही असू शकते. त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष न करता डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा.

* अर्धशीशीचा त्रास बराच काळपर्यंत राहतो. यात डोक्याचा अर्धा भाग दुखतो. प्रकाश आणि आवाजाचा त्रास होतो. काहींना मळमळणं, उलट्यांचा त्रासही होतो. पुरूषांच्या तुलनेत महिलांना अर्धशीशीचा जास्त त्रास होतो. अपुरी झोप, अवेळी जेवणं, जेवण टाळणं, डिहायड्रेशन, हार्मोन्सचं असंतुलन, ॲलर्जी ही अर्धशीशीची काही कारणं आहेत. अर्धशीशीच्या वेदना सुरू होण्याआधी डोळ्यांपुढे प्रकाशाचे झोत येणं, वेगवेगळ्या आकृत्या दिसणं, ठिपके दिसणं अशी लक्षणं दिसून येतात. अर्धशीशीचा त्रास असणारे ३ ते १३ टक्के रूग्ण यावर प्रतिबंधात्मक औषधोपचार घेतात. आठवड्यातले तीन ते सहा दिवस तीव्र स्वरूपाची डोकेदुखी होत असेल तर डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा.



* वाढत्या ताणतणावांमुळे डोकेदुखी उद्भवते. हा त्रास कोणालाही होऊ शकतो. ताणामुळे संपूर्ण डोकं दुखतं. या वेदना तीव्र स्वरूपाच्या नसल्या तरी त्याचा त्रास जाणवतो. अशा परिस्थितीत ओटीसी वेदनाशामक औषधं घेता येतील. यामुळे आराम पडला नाही तर डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा.
* सायनसमुळे डोकं दुखत असेल तर रूग्णाला गाल आणि डोळ्यांलगतही वेदना जाणवतात. अर्धशीशी असतानाही अनेकदा सायनसचं निदान केलं जातं. सायनसच्या ९० टक्के रूग्णांना प्रत्यक्षात अर्धशीशी असते.
* बरेचदा अगदी काही सेकंदांसाठी डोक्यात तीव्र स्वरूपाच्या वेदना जाणवतात. वैद्यकीय भाषेत त्याला 'थंडरक्लॅप' असं म्हटलं जातं. अवघ्या ६० सेकंदांमध्ये तीव्र स्वरूपाच्या वेदना जाणवू शकतात. या वेदना अवघ्या पाच मिनिटं टिकत असल्या तरी त्यामुळे गंभीर समस्या निर्माण होऊ शकते. यामुळे स्ट्रोक, ब्रेन हॅमरेजसारखे जीवघेणे आजार होऊ शकतात.
* हार्मोन्सच्या असमतोलामुळे डोकेदुखी उद्भवते. ही समस्या महिलांमध्ये जास्त प्रमाणात आढळते. मासिक पाळी, गर्भनिरोधक गोळ्या, गरोदरपणा यामुळे महिलांच्या शरीरातल्या एस्ट्रोजेनवर परिणाम होऊन डोकं दुखू शकतं.
* कॅफेनच्या अतिसेवनामुळे डोकेदुखी उद्भवू शकते. कॅफेनमुळे मेंदूला होणाऱ्या रक्तपुरवठ्यावर परिणाम होतो. कॅफेनचं प्रमाण कमी करणं किंवा त्याचं सेवन पूर्णपणे थांबवणं हे यावरचे काही उपाय आहेत.
* दगदगीमुळेही डोकं दुखू शकतं. यात दोन्ही बाजूंनी डोकं दुखतं. तीव्र स्वरूपाच्या व्यायामामुळे कवटीला जास्त प्रमाणात रक्तपुरवठा होतो आणि डोकं दुखू शकतं.
* उच्च रक्तदाबाच्या रूग्णांना ही समस्या जाणवू शकते. उच्च रक्तदाब असलेल्यांना तीव्र स्वरूपाची डोकेदुखी जाणवत असेल तर ते रक्तदाब खूप वाढल्याचं लक्षण असू शकतं.
* डोक्याला दुखापत झाल्यानंतर तीव्र स्वरूपाची डोकेदुखी उद्भवू शकते. दुखापतीनंतर ६ ते १२ महिन्यांपर्यंत ही डोकेदुखी जाणवू शकते.

**नवसंशोधन**

## सुपरबग पसरतोय!


कोणत्याही प्रतिजैविकाला दाद न देणारा विषाणू म्हणजे सुपरबग रूग्णालयांच्या विभागांमधून झपाट्याने पसरत असल्याचं संशोधकांचं म्हणणं आहे. या विषाणूवर कोणतीही औषधं लागू पडत नाहीत. घातक संसर्ग आणि जीवघेण्या विकारांना हा विषाणू कारणीभूत ठरत आहे. जगभरातच हे प्रमाण वाढत असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली आहे. ऑस्ट्रेलियातल्या शास्त्रज्ञांनी याबाबत इशारा दिला आहे. मेलबर्न विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी जगभरातल्या दहा देशांमधून आलेल्या नमुन्यांमधून प्रतिजैविकाला दाद न देणाऱ्या विषाणूंच्या तीन प्रजातींचा शोध लावला आहे. जगभरातल्या ७८ रूग्णालयांमधल्या नमुन्यांचा अभ्यास या संशोधनासाठी करण्यात आला.



**डोळ्यांचं आरोग्य**

## जांभई देताना डोळ्यांमधून पाणी का येतं?

जांभई आली की डोळ्यांमधून पाणी येतं. यामागचं कारण काय तर भुवयांच्या खालच्या भागातल्या ग्रंथींमुळे डोळ्यांमध्ये अश्रू तयार होतात. या ग्रंथींमधून दिवसभर पाण्याची निर्मिती होत असते. यामुळे डोळे ओलसर राहतात. जांभई आल्यावर चेहऱ्याचे स्नायू ताणले जातात. भुवयांखालच्या ग्रंथींवर ताण येतो. या ताणामुळे अश्रू निर्माण करणाऱ्या ग्रंथी खेचल्या जातात आणि नेहमीपेक्षा जास्त पाणी तयार होतं. त्यामुळे मोठी जांभई आली की डोळ्यांमधून पाणी येतं.



**दंतारोग्य**

## डेंटल फ्लुओरोसिसविषयी...

वयाची १२ ते १४ वर्षं पूर्ण होण्याआधी काही मुलांचे दात फ्लुओराइडच्या संपर्कात येतात. त्यांना डेंटल फ्लुओरोसिसचा धोका असतो. केरळमधल्या एका जिल्ह्यातल्या तब्बल ४० टक्के मुलांना फ्युओरोसिस असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. ग्रामीण भागामध्ये या विकाराचं प्रमाण जास्त आहे. या भागात पिण्यासाठी विहिरीचं किंवा हातपंपाने काढलेलं पाणी वापरलं जातं. पाण्यात एक पीपीएमपेक्षा जास्त फ्युओराइड असेल तर अशा भागांमधल्या मुलांना फ्लुओरोसिसचा धोका असतो. तसंच कॅल्शियमची कमतरता असलेल्या मुलांनाही हा विकार होऊशकतो.



**आजीबाईचा बटवा**

## बहुगुणी कोबी

कोबीमध्ये पोषक घटकांचा खजिना असतो. यात भरपूर प्रमाणात जीवनसत्त्व आणि खनिजं असतात. कोबीमध्ये 'क' आणि 'के' ही जीवनसत्त्वं मुबलक प्रमाणात असतात. मॅग्नेशियम, फॉलिक ॲसिडसह भरपूर फायबर असतं. पॉलिफेनॉल्स हे ॲंटिऑक्सिडंट्स असतात. यातल्या फायबरमुळे बद्धकोष्टतेची समस्या दूर होते. तर पॉलिफेनाल्ड हृदयविकार आणि कॅन्सरला प्रतिबंध करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. पचनासाठीही कोबी चांगला असतो. कोबीच्या सेवनामुळे मेंदूचं कार्य सुधारतं. वजन कमी करायचं असेल तर कोबीचं सेवन वाढवावं. अनेक गुणधर्मांनी युक्त कोबी आहारात असायला हवा.

